म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ५४५
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
सं. काव्य नं. ५४५
REFBK-0002567
REFBK-0002567

# स्त्री-गीत-रत्न-मंजूषा.

—: कवयित्री :—

सौ. अन्नपूर्णाबाई देसाई.

REFBK-0002567
REFBK-0002567

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून
सर्व हक्क प्रकाशकानें आपल्याकडे ठेविले आहेत.

१९२४.

किंमत ८ आणे.

प्रकाशक

सौ. अन्नपूर्णाबाई देसाई, मु. शीळ, ता. राजापूर.

मुद्रक

गोविंद नारायण दातार,

"दातार छापखाना" १७१ गुजराळी, राजापूर.

**प्रकाशक**

सौ. अन्नपूर्णाबाई देसाई, मु. शीळ, ता. राजापूर.

**मुद्रक**

गोविंद नारायण दातार,

"दातार छापखाना" १७१ गुजराळी, राजापूर.

श्री ग्रंथ संग्रहालय
२५६७
स्थळप्रत

## प्रस्तावना.

श्लोक. (शार्दूलविक्रीडित.)

स्त्रीगीतावलिरत्नपेटि खरि ही त्या पाहिजे पारखी
आहे काय तिच्यांत कोणि म्हणती अत्यंत हे बारकी ॥
जो रत्नाकरिं दे तळिं बुडि तया तीं लाभती मौक्तिकें
पाहातां वरुनीच तीं न दिसती रत्नप्रवालादिकें ॥ १ ॥

श्लोक. (इंद्रवज्रा.)

शब्दार्थ या शुक्तिस ऊकलीतां
लाभेल सद्बोध हि सत्य मुक्ता ॥
संग्राह्य वाटेल हवीहवीशी
जी वाचितां नित्य नवीनवींशी ॥ २ ॥

गीतरत्नमंजूषा हें लहानसें पुस्तक भगिनिवर्गापुढें ठेवलेलें असल्यामुळें तें कसें आहे, याबद्दल स्वतः विवेचन करणें म्हणजे आरशांत कंकणें पाहाण्यासारखें होणार आहे. म्हणून त्याचा जास्त उहापोह न करितां मी इतकेंच सांगतें कीं आर्यधर्माचें रहस्य जी अंतर्दृष्टि ती ज्या भगिनींत असेल, त्यांनांच या गीतांचें कौतुक वाटेल. या पुस्तकावर कित्येकांकडून असा दोषारोप येण्याचा संभव आहे कीं, हीं गाणीं जरी नवीन, सुंदर व सरळ चालींवर आहेत, तरी यांतील बरेच शब्द लहान मुलींना समजण्यासारखे नाहींत. ही गोष्ट खोटी आहे असें मीहि म्हणत नाहीं. प्राचीन काळच्या

श्रीधर, मध्वमुनीश्वर इत्यादि कवींनीं व कित्येक पुराणकथाभिज्ञ स्त्रियांनीं रचलेलीं गाणीं संगीत चालींवर नसलीं, तरी त्यांत अर्थगांभीर्य फार असे. एका स्त्रीनें दुर्वासभोजनाच्या वेळीं असें वर्णन केलें आहे कीं, ' भात मोगरीच्या कळ्या जिरेसाळी । जैशीं नक्षत्रें दीसती ध्रुवमंडळीं । तैशा वाढल्या कोशिंबिरी शाकावळी । ' हें गाणें सुंदर चालींवर नसलें तरी यांत अर्थगांभीर्य कसें आहे तें पहा. ध्रुवाचा तारा अढळ असून त्या भोंवतीं सर्व तारे फिरतात, ही गोष्ट शिक्षण नसूनहि त्या बाईला माहीत होती, व ती तिनें या ठिकाणीं मोठ्या चातुर्यानें ग्रथित करून ठेविली आहे.

त्या नंतरच्या मधल्या काळांतील बरींच गाणीं अर्थशून्य बडबडीप्रमाणें होतीं. अलीकडच्या स्त्रियांना लिहितां वाचतां येऊं लागल्यामुळें मोठमोठीं गाणीं घोकून पाठ करण्याकडे त्यांचा कल नाहींसा होत चालला आहे. व संगीताचा प्रसार झाल्यापासून कित्येक भगिनींनीं सुंदर चालींवर चुटके रचिले आहेत. परंतु त्यांचा भर चालींवरच असल्यामुळें या अगदींच त्रोटक गाण्यांतून अर्थनिष्पत्ति होत नाहीं. पूर्वींचीं गाणीं साधीं असल्यामुळें वल्कलें परिधान करणाऱ्या ऋषिपत्न्यांप्रमाणें बाह्यांगसौंदर्य त्यांत नाहीं व अलिकडच्या बहिर्दृष्टि काळांत सर्व झोंड बाह्यांग सौंदर्यांत असल्यामुळें कवितेचें मुख्यांग जी अर्थनिष्पत्ति तिकडे दुर्लक्ष्य झालें आहे. या दोन्हीं उणीवा भरून काढून अल्पशी भगिनिसेवा करावी, या हेतूनें हीं गाणीं रचिलीं आहेत. ही माझी कृति भगिनिवर्गास मान्य झाल्यास दुसऱ्या भागांत याहांपेक्षां सुंदर गाणीं अर्पण करण्याचा विचार आहे. प्रिय भगिनींनो, या गाण्यांचें जसजसें अधिक चर्वण कराल, तसतशी तुम्हाला यांची विशेष गोडी कळून येईल, व मननपूर्वक वाचल्यास शब्द समजत नाहींत हा मजवरचा आरोप आपोआपच दूर होईल, इतकें सांगून, मी ही प्रस्तावना पुरी करितें.

श्रीगजाननप्रसन्न.

सौ. अन्नपूर्णाबाई देसाई कृत

# स्त्री-गीत-रत्न-मंजूषा.

श्री ग्रंथ संग्रह
क्रमांक नं. ६६
ता.
ठा. पो.

## गाणें १ लें, गणपति.

चाल— ( आजिम्यां ब्रह्म० )

झळ झळ झळके चंद्र ललाटीं ॥ लख लख रत्नें सुवर्ण मुगुटीं ॥ लगमग मयुरसुपुच्छें वेटीं ॥ कर्णी कुंडलां ॥ गजानन कर्णी कुंडलां ॥ वक्रतुंड भगवान दयानिधि ॥ भेटी दे मला ॥ गजानन भेटी दे मला ॥ वक्र० ॥ १ ॥ शेंदुर चर्चित शुभांग सारें ॥ वक्ष मिरविलें मौक्तिकहारें ॥ तोडर वाक्या घुंगुर गजरे ॥ नाचूं लागला ॥ गजानन नाचूं लागला ॥ वक्र० ॥ २ ॥ कंठिं मालती चंपकमाला ॥ तिळगुळ लाडू चहुं करकमळां ॥ भक्तियुक्त दूर्वांकुरत्रिदलां ॥ वाहातां तुष्टला ॥ गजानन वाहातां तुष्टला ॥ वक्र ० ॥ ३ भरजरि पीतांबर कटिं साजे ॥ दिव्य मेखला वरति विराजे॥ ध्यानिं दिलें दर्शन गणराजें ॥ प्रेमा दाटला ॥ गजानन प्रेमा दाटला ॥ वक्र० ॥ ४ ॥ नख चंद्राकृति किरण फां-

कले ॥ कोमल पद जणुं पंकज फुललें ॥ भ्रमर भ्रांतिनें भक्तचि जमले ॥ प्राशूं मधुजला ॥ गजानन भक्तीमधुजला॥ वक्र० ॥ ५ ॥ अनन्यशरणागत अन्नपूर्णा ॥ प्रार्थितसे तुज कां नच करुणा ॥ ब्रीद बांधिलें दीनोद्धरणा ॥ भक्तवत्सला॥ गजानन भक्तवत्सला ॥ वक्र० ॥ ६ ॥

# गाणें २ रें, गणपति.

चाल— ( भाव धरोरे )

शंभुसुता रे ॥ पावन तव जन्मकथा रे ॥ धृ० ॥
मंगलस्नानें करी पार्वती ॥ वस्त्र फेडुनीयां एकान्तीं ॥
सुवक हळदिची लिंपी मूर्ति ॥ गिरिदुहिता रे ॥ पावन०
त्यामध्यें चैतन्यहि भरलें ॥ लावि कौतुकें कपाळिं काळें ॥
गालबोट गालासि लाविलें ॥ चुंबीतां रे ॥ पावन० ॥
न्हातें बालका माता वदली ॥ पाशांकुश करिं आयुधें दिधलीं ॥
पुरुष न येऊं देइं यास्थळीं ॥ तोंवरिता रे ॥ पावन० ॥
इतुक्यामध्यें शंकर आले ॥ उभयतांमध्यें युद्ध जाहलें ॥
अचलसुता अति क्रोधें बोले ॥ शिर तुटतां रे ॥ पावन० ॥
कां हो माझ्या बाळा वधिलें ॥ म्हणाल मजविण कैसें झालें॥
सांगा त्रिभुवन कोणीं रचिलें ॥ ही वार्ता रे ॥ पावन० ॥
भोळे शंकर बहु गहिवरले ॥ हस्तिकलेवर होतें पडलें ॥
शीर बसवितां पूर्वींहुनि खुले ॥ मंगलता रे ॥ पावन ० ॥

प्रभुवर शंकर त्या वर देती ॥ तुला पूजितां विघ्नें टळती ॥
नमि अन्नपूर्णा आराध्य मूर्ति ॥ गणनाथा रे ॥ पावन०॥

## गाणें ३ रें, देवी-वंदन.

चाल— ( हा नको नको० )

लक्ष्मी सरस्वती काली ॥ ते आर्यादुर्गा झाली ॥
या कोंकण प्रांतीं वसली ॥ कुळस्वामीण ॥ मी झालें तव पदीं लीन ॥ चरण वंदीन ॥ मी झालें तव पदीं लीन ॥ धृ ॥
गे सर्वमंगले स्फूर्ति ॥ करिं प्रवेश झणिं मम चित्तीं ॥
दे कवित्व करण्या सुमती ॥ तुझ्या स्वाधीन ॥ मी झालें ॥
ती मूळमाया प्रकृति ॥ नामातित अद्भुत शक्ति ॥
म्हणे दोष विघ्न जे करिती ॥ ते निवारीन ॥ मी झालें० ॥
पार्वती जगाची माता ॥ श्रीधूतपापप्रियकांता ॥
म्हणे बाहु नको मनिं चिंता ॥ सर्व शिकवीन ॥ मी झा०॥
तूं शीलवासि नवदुर्गे ॥ ये धांवुनि उद्धारिं वेगें ॥
अन्नपूर्णा तव पदिं लागे ॥ असे मतिहीन ॥ मी झालें० ॥

## गाणें ४ थें, धोपेश्वर.

चाल— ( श्रीराम सुजन विश्राम० )

उत्तुंग दोन्हि बाजुशीं रम्य गिरिवर ॥ वाढले वृक्ष सुंदर

अश्वत्थ पुण्य वट साग पक्षि त्यावर ॥ किति चास को-
किला कीर ॥चाल॥ बहु पारिजात मोगरी ॥ फुलबहर सुवास
भारी ॥ तें सुरम्य स्थल नरनारी बघुनि हर्षती ॥ धोपेश्वर
वर्णिन कीर्ती ॥ श्रीधूतपाप त्रयताप दर्शनें हरिती ॥ धोपे०
झालि रुंद मृडानी नदी ॥ पात्र उथळ ॥ बोलती त्यासि
धाऊळ ॥ तळ कृष्ण कातळीं युक्त नीर निर्मळ ॥ करि
घोष शब्द खळखळ ॥ चाल ॥ विमलांबु लोटे झरझरां ॥
जणुं रौप्ययंत्रिच्या तारा ॥ कोव्यावधि पडती धारा कोटि
तीर्थीं ॥ धोपेश्वर० ॥ २ ॥ तें कोटितीर्थ किति खोल-
कळेना पार ॥ तिरिं गाय कोरिली गार ॥ वरि धूतपाप-
मंदीर पुरातन फार ॥ बांधिलें सुबक मनोहर ॥ चाल ॥ स्वायंभु
लिंग तें आहे ॥ अभिषेक करिति द्विज पाहें ॥ आनंद प्रेम
न समाये ॥ उचंबळे वृत्ति ॥ धोपेश्वर ॥३॥ सर्वांगिं मलय
चंदन लेपिती गंध ॥ शिरिं सुमनभार बहुवीध ॥ अक्षता
बिल्वदल दीप नित्य नैवेद्य ॥ वाजंत्रि वाजे नौबत ॥
॥ चाल ॥पालखी प्रदक्षिण फीरे ॥ स्तुति कंचुकी गर्जती
गजरें ॥ अब्दागिर छत्रचामरें भेरी ध्वज आरती ॥ धो० ॥
भोंवताला बांधिला तट वाट सुंदरशी ॥ सारि जागा केली
फरशी ॥ बहु भव्य सभामंडपिं छताची नक्षी ॥ किति
हंड्या झुंबर त्यासी ॥ चाल ॥कोरींव खांब ते सारे ॥ अति
सुरम्य माहाद्वारें ॥ बंगले पांथमंदिरें हवाशिर असती ॥
धोपेश्वर० ॥ ४ ॥ उत्साह माघमासांत होतो देवाचा ॥ वद्

काय थाट तेव्हांचा ॥ झळझळे हेममय सांब पंचवदनाचा ॥ बहुमूल्य पितांबर त्याचा ॥ चाल ॥ वरी दिव्य दीप्ति मेखला पांघुरला भरजरि शेला ॥ नक्षत्र शोभती माला मांडिल्या पुढती ॥ धोपे० ॥ ५ ॥ अति थोर हार पुतळ्यांचे रुळति पद-कमला ॥ बहु सुरंगि सुमनें माला ॥ किति रत्नमुक्तभूषणें हिरे पदकाला ॥ मोत्यांचा तुरा खोवीला ॥ चाल ॥ निल उंची शिरोभूषण ॥ रत्नांचें केलें कोंदण ॥ शिरपेंच कल-गिच्या मधुन झिरमुळ्या रुळती॥ धोपे० ॥ ६ ॥ वामांगिं पार्वती बसे नेसे पैठणी ॥ कंचुकी चहूं भुजांवरुनी ॥ नथ वांकि गोट पाटल्या तोडे कांचनी ॥ मृदु हस्तकीं तैसे चरणीं ॥ चाल ॥ सरी कंठा थोरमणि माला ॥ कमळांचि रुळे पदकमलां ॥ पेट्या मंगळसूत्र साजाला श्रवणीं नग हलती ॥ धोपे० ॥ ७ ॥ शिवकंठिं भूषणें फार रीघ नच तेथें ॥ अत्यल्प स्तोत्रमालेतें ॥ अचतुरें गुंफिली प्रभो शोभे परी तूतें ॥ अति प्रेमें चरणीं वाहातें ॥ चाल ॥ तुजवरुनि करिन मिटकणी ॥ हा देहचि ओवाळुनी ॥ अन्नपूर्णा लोळे चरणिं देई सद्गती ॥ धोपेश्वर वर्णिन कीर्ति ॥ ८ ॥

## गाणें ५ वें, नवरात्र.

चाल :— जा जा जा झणीं घेउनि०

या या या वंदूं या झणीं ॥ मम कुलस्वामीनी ॥

शरत्काल आला विकसति जलिं कमला ॥ दुर्गेच्या पूजेला हर्ष होय स्वमनीं ॥ या या या ० ॥ १ ॥ सदनिं धान्य विलसे ॥ कृषिवल कुल हर्षे ॥ जगदंबा घटिं बैसे ॥ आसन्न दृढ करुनी ॥ या या या ० ॥ २ ॥ नित्य दीप लावूं ॥ पुष्पमाळ वाहूं ॥ पक्कान्नें दिवस नऊ ॥ नैवेद्य करुनी ॥ या या या ० ॥ ३ ॥ सप्तशती पाठ ॥ पूजनविधि थाट ॥ सुवासिनी द्विजश्रेष्ठ ॥ भोजन घालोनी ॥ या या या ० ॥ सप्तशतीहवन ॥ उत्सव संपूर्ण ॥ ग्रहयज्ञ बलिदान ॥ मग शमि पूजोनी ॥ या या या ० ॥ ५ ॥ यापरि करुं भक्ति ॥ देवि दिव्यशक्ति ॥ आराधूं नवरातीं ॥ अति प्रेमें करुनी ॥ या या या० ॥६॥ न्यूनाधिक होतां ॥ क्षमा असो चित्ता ॥ उद्धरिं तूं चरणनता॥ मजशिं कृपा करुनी॥ या या या०॥७॥ सिंहवहनिं वससी ॥ ध्यानिं रम्य दिससी ॥ जयसिद्धि भक्तांशीं ॥ दे सुखवरदानी ॥ या या या ० ॥ ८ ॥ अर्पुनि संपदा ॥ वारिं सर्व विपदा ॥ अन्नपूर्णा शरण पदा ॥ आळवित निशिदीनीं ॥ या या या ० ॥ ९ ॥

## गाणें ६ वें, गंगा.

चाल :— तिळ गुळ घ्या०

शहर राजापुरीं तेथें ॥ श्री गंगा पातक हरिते ॥
विमल मधुर जल झरे उमटती ॥ अकस्मात ते कोठुनि येती ॥

हें न कळे मुळिं कवणातें ॥ जाऊं स्नाना चला तेथें ॥ श्री० ॥ विपुल जलाशय तलाव गमला ॥ काशिकुंड जन बोलति त्याला ॥ ते गायमुखांतुनि वाहाते ॥ जाऊं ० ॥ २ ॥ गायमुखांतुनि जलौघ पडतां ॥ कौतुक वाटे अतिशय चित्ता। किति यात्रा त्यातळिं नाहाते ॥ जाऊं ० ॥ ३ ॥ वटतळिं चवदा कुंडांमधुनी ॥ भिन्न रुचिर जल वाहे भरुनी ॥ ती शोभा अभिनव गमते ॥ जाऊं ० ॥ ४ ॥ धूतपापशिरिं हें गंगाजल ॥ पडतां उद्धारि बेचाळिस कुल ॥ करी पावन अन्नपूर्णेतें ॥ जाऊं ० ॥ ५ ॥

## गाणें ७ वें, ओजःशक्ति.

चाल— मधुर मधुर हरि

वसंतिं वन अति शृंगारीलें ॥ कुसुमित तरुवर कोकिल बोले ॥ आम्रमंजिरी विविध वनफुलें ॥ सुगंध पसरला काननीं सुगंध पसरला ॥ गाधिज मुनिवर सुतप निरंतर ॥ करितां त्याजला सुरवधु भुलवी त्याजला ॥ धृ० ॥ १ ॥ निर्मल नदिजल स्नानें करुनी ॥ प्राणवायु नियमुनि सिध्दासनिं ॥ श्री सर्वेश्वरपदिं लय लावुनि ॥ ध्यानीं विनटला ॥ कौशिक ध्यानीं विनटला ॥ गाधिज० ॥ २ ॥ मंजुळ मंजुळ नुपुरें वाजति ॥ कंकण मृदुरव कर्णी येती ॥ समाधि उतरे नेत्र उघडती ॥ देखे रमणिला ॥ मनोहर देखे रमणिला ॥

गाधिज० ॥ ३ ॥ म्हणे मेनका मुनिपद नमुनी ॥ विमानीं फिरतां आश्रम पाहुनी ॥ क्षणभरि सेवा नृत्य गायनीं ॥ करुनी स्वस्थला ॥ मनीं ये जावें स्वस्थला ॥ गाधिज० ॥ ४ ॥ नृत्यगायनें शिणसी शुभांगे ॥ बैस म्हणे कौशिक अनुरागें ॥ श्रुति पठतां प्रिय शिष्यां रागें ॥ करितां गलबला म्हणे बहु करितां गलबला ॥ गाधिज० ॥ ५ ॥ विषय वनींचा मिलिंद झाला ॥ काय तारितो गुरु अपुल्याला ॥ शिष्यवृंद अति खेदें त्याला ॥ त्यजुनी चालला ॥ निजगृहीं त्यजुनी चालला ॥ गाधिज० ॥ ६ ॥ विश्वामित्रा मित्रहि धाके ॥ तेजें तें मुख पडलें फिकें ॥ गेलें सकलहि तेज मेनके ॥ गर्भ राहिला ॥ उदरीं गर्भ राहिला ॥ गाधिज० ॥ ७ ॥ संततिसाठीं तप आचरती ॥ पूर्वज पुराणीं ऐकिलि ख्याती ॥ प्राणापरि निजवीर्य रक्षिती ॥ निपजे दृढबला ॥ प्रजा तैं निपजे दृढबला ॥ गाधिज ० ॥ ८ ॥ म्हणुनि मनाच्या अद्भुत शक्ति ॥ योगि इंद्रियां वेचुं न देती ॥ सकल एकवट करुनि बनविती ॥ ओजःशक्तिला ॥ बलवति ओजःशक्तिला ॥ नियमित राहे आहारविहारीं ॥ जरि सामान्यहि जन संसारीं ॥ चांचल्यातें त्यजुनि भजे हरि ॥ होई त्याजला ॥ ओजःप्राप्ती त्याजला ॥ १० ॥ म्हणे अन्नपूर्णा राहाणी साधी ॥ चहासम भलती नसो उपाधी ॥ व्यसन चैनिनें जडुनी व्याधी ॥ दुर्बल जाहला ॥ समाज अति दुर्बल जाहला ॥ ११ ॥

# गाणें ८ वें, प्रीतिविवाह.

चाल :— कमलनयन भुजगशयन ०

प्रीतिविवाहासि असे शास्त्रसंमती ॥ पौरवंशिं शकुंतले सांगे भूपती ॥ धृ० ॥ सारवोनि विमल करुनि पर्णकूटिका ॥ रम्य रंगवल्लि काढि मूनिकन्यका ॥ कण्वमुनी अतिथि कोणि मारितां हका ॥ शीघ्र येइ विनयशिला द्वारिं गजगती ॥ प्रीति० ॥ १ ॥ नदीतिरीं तात गेले संध्यावंदना ॥ बसा म्हणे येति अतां देइ आसना ॥ पाय धुवुनि पुष्पमाल अर्पि चंदना ॥ कंदमुळें मधुर फळें पूजि अतिथी ॥ प्रीति० ॥ २ ॥ राव म्हणे चारुगात्रि पद्मलोचनी ॥ ब्रह्मचारि ऊर्ध्वरेत कण्व महामुनी ॥ कन्या त्यासि म्हणसि नवल वाटतें मनीं ॥ उत्सुक मम वृत्त कथुनि तृप्तवीं श्रुती ॥ प्रीति ० ॥ ३ ॥ महातप आचरितां स्वासि कौशिका ॥ विघ्न करावया धाडि इंद्र मेनका ॥ भुलुनि तिजसि जन्म दिला मजासि आयका ॥ पिता माय त्यजुनि जाय कण्व रक्षिती ॥ प्रीति० ॥ ४ ॥ अथित्यादरेंशि तुवां शीण निरशिला ॥ चंद्रवंशि भूप तुजशिं वघुनि तोषला ॥ मत्तशत्रुसंघ समरिं जाणें जिंकिला ॥ कुसुमचाप देइ ताप रक्षिं संप्रती ॥ प्रीति ० ॥ ५ ॥ शिकारीस आलों मृगामागें लागुनी ॥ आश्रमींचा हरिण तुझ्या दिधला सोडुनी ॥ विंधिसि मम चित्तमृग मृगलोचनी ॥

भ्रूधनुष्यि नेत्रबाण मर्म भेदिती ॥ प्रीति० ॥ ६ ॥ कुंददंति इंदुवदनि मंजुभाषिणी ॥ वास तुजसि योग्य नव्हे या तपोवनीं ॥ कुसुमकांति शोभसि तूं पुष्पशयनीं ॥ पट्टराणि होइं शीघ्र वरुनि मजप्रती ॥ प्रीति० ॥ ७ ॥ शकुंतला म्हणे नृपा गूणगंभिरा ॥ पौरवकुल अंबरीचे ज्ञानदिनकरा ॥ ब्रह्मविधिनें मुनिसि मजसि प्रार्थुनी वरा ॥ धर्म काम कीर्ति मोक्ष येणें साधिती ॥ प्रीति० ॥ ८ ॥ गृहस्थासि मुख्य धर्म अतिथि कामना ॥ दवडिशि तूं मजसि काम पुरविल्या विना॥ विकलगात्र होय केंवि मृत्यु येइना ॥ कामुकासि हावभाव ढंग सूचती ॥ प्रीति० ॥ ९ ॥ पाहिलें तें शीघ्र अंगिकारुं इच्छिणें ॥ योग्य नव्हे आवडतें मूल भक्षिणें ॥ समयिं मजसि स्मरति अशीं बोधवचनें ॥ विवेकासि त्यजुं न देइं चित्तसंस्कृति ॥ प्रीति० ॥ १० ॥ राव म्हणे वाढिलींस वन्य हीं फळें॥ कटुक वीष असति काय वृत्ति चावळे ॥ त्याज्य बीज पृष्ठि कोष मजशि नाकळे ॥ केंवि भक्षुं जाइन क्षुधित निजपुराप्रती ॥ प्रीति० ॥ ११ ॥ कण्वाशिष्य वैद्य जोतिषादि पंडित ॥ परिक्षुनी मधुर फळें नित्य आणित ॥ शुध्द चित्तें भेद करुनि देइं त्यांप्रत ॥ भक्षुनियां देवि म्हणे वैस खालती ॥ प्रीति० ॥ १२ ॥ प्रिये तुजशि लाविती न वडिल दूषणें॥ परस्परें वारिति जरी प्रेमलक्षणें ॥ अष्ट विवाहांत विधी श्रेष्ठ हा म्हणे ॥ गांधर्व विधी लग्न यासि बोलती श्रुती ॥ प्री०॥ मधुर फळें वदनिं बळें देत निज करीं ॥ अपार्णेता मुनीसुता

मराठी ग्रंथ संग्रहालय नोंद नं. २५१५४ ठाणे

अंकिं दृढ धरी ॥ जाहलीस पृथ्विची या स्वामिणी खरी ॥ रथगज पाठवुनी नेइन तुजप्रती ॥ प्रीति ॥ १४ ॥ मधुर वाक्य मोहजाल पुरुष टाकुनी ॥ गोवुं पाहाति विमलचित्त मीनलोचनी ॥ सावधान सतत भागिनि असुत ऐकुनी ॥ फिरति पुढें फिरालि जशी नृपतिची मती ॥ प्रीति० ॥१५॥ नोलि नाहिं शकुंतले ओळखी न दे ॥ राहावया जातां निंद्य दूषणेंहि दे ॥ परिणाम अन्नपूर्णा यापरी वदे ॥ म्हणुनि शास्त्रें प्रेमविधी त्याज्य मानिती ॥ प्रीतिविवाहासि न दे शास्त्र संमती ॥ १६ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय २५१५४ ठाणे

## गाणें ९ वें, इंद्रभुवन.

चाल—तिळ गुळ घ्या.

त्यजीं बाळे अशा पतितें ॥ तूं चाल इंद्रभुवनातें ॥ धृ० ॥ वदे मेनका शकुंतलेला ॥ नृपदुष्यंतें फसविलि तुजला ॥ शास्त्र कथुनि प्रीतिविवाहाला ॥ लावुनि झणिं नोळखि तूतें ॥ त्यजिं० ॥ १ ॥ काय कथूं तें स्वार्गीय वैभव ॥ कुसुमित कांचन लतिका पल्लव ॥ सुवर्ण भृंगावलि गुंजारव ॥ करि मंजुळ अति मृदु ध्वनि ते ॥ त्यजीं० ॥ २ ॥ नवरत्नांचे खडे पसरले ॥ कल्पवृक्ष फलभारें लचले ॥ पारिजाततरु अमिताचि फुलले ॥ सुमवृष्टी सतताचि होते ॥ त्यजीं० ॥ ३ ॥ क्षीर सुधारस स्वर्धुनिमधुनी ॥ अमित उगवल्या सुवर्ण नलिनी ॥

मौक्तिकसिकता पसरलि पुलिनीं ॥ कलहंस सेविती त्यातें ॥ त्यजीं०॥ ४॥ चंदनवन घर्षण चुर घेवुनि ॥ वातलहारि त्या खेळति निशिदिनीं ॥ ऐरावतयुथ क्रीडति गगनीं ॥ उधळुनि अति मृगमद्धुळितें ॥ त्यजीं० ॥ ५ ॥ आम्रमंजिरीसुवास परिकर ॥ कोकिल कलरव करिति निरंतर ॥ पुष्पपरागें दि-ग्वधु धूसर ॥ करि अगणित उपवनततितें ॥ त्यजीं ० ॥ ६ मणिमय सुरम्य सदनामधुनी ॥ पाहुनि सुरललना शशि-वदनी ॥ क्षीरसरोवरिं फुलति कुमुदिनी ॥ मग विधु वरि पांडुरतेतें ॥ त्यजीं० ॥ ७ ॥ चिंतित चिंतामणि पुरवीती ॥ कामधेनु नंदनवनि चरती ॥ पयफेनाचे निर्झर वाहाती ॥ दे तृप्ति पुण्यवंतातें ॥ त्यजीं० ॥ ८ ॥ धिमकिट धिमकिट वाद्यनिनादें ॥ गाति अप्सरा विविध सुछंदें ॥ ताथातकथइ नृत्यविनोदें ॥ रिझविति सुरसखि सकलांतें ॥ त्यजीं ॥ ९ ॥ इंद्रसभा अति सुंदर विलसे ॥ रवि शशि तारे दिपति प्रकाशें ॥ बहुपुण्याविण दुर्लभ भासे ॥ तुज नेइन सत्वरिं तेथें ॥१०॥ स्वर्गविभविंच्या ऐकुनि गोष्टी ॥ हर्ष होय बहु हृदयसंपुटीं ॥ स्वर्ग निर्मिला पुनितांसाठीं ॥ कां सांगशि आधिं न मातें ॥ कथीं जननी उपायातें ॥ स्त्री शुचिता हो सम वच तें ॥११॥ पुण्यजनाचा करतल-अमलक ॥ होय जननि तो तव सुर-लोक ॥ सुकृतीआधीं इच्छिति सौख्य ॥ तरि मूढचि जन समजा ते ॥ कथीं० ॥ १२ ॥ यास्तव पति जरि त्यजितिल मजला ॥ जाइन सत्वर तपोवनाला ॥ जपतप स्मरणें अळ-

वुनि प्रभुला ॥ होईन पात्र स्वर्गातें ॥ कथीं० ॥ १३ ॥ नेशिल स्वर्गीं जरि मज जननी ॥ अधिकाराविण मानि न कोणी ॥ सकल सुखें सन्मानावांचुनि ॥ तरि सुजना मरणाचि गमतें ॥ कथीं० ॥ १४ ॥ विवाहविरहित जरि इंद्रासीं ॥ रततां सहजचि होइन दासी॥ हा अपमान न कुलस्त्री सोशी ॥ बहु भुलविति परनर जरि ते ॥ कथीं० ॥ १५ ॥ यापरि बोले भारतमाता ॥ भरतभगिनो ॥ ऐका आतां ॥ नटिक व्हाल परपुरुषीं रमतां ॥ अभिमान असो चित्तातें ॥ क० ॥ मृत्युलोकिंच्या भोळ्या युवती ॥ नरकपटाला बहु बळि पडती ॥ निर्मलताहि न पावति खंती ॥ किति त्यागिति मग प्राणांतें ॥ कथीं०॥ १७ ॥ गंगा अथवा धेनू म्हणती ॥ शुचि गुण स्मरुनी उपजे भक्ती ॥ वंद्य व्हावि ताशि कामिनि जाती ॥ जगिं सकलहि विमल सुचारितें ॥ कथीं ॥ १८ ॥ स्त्रिया असे मुखिं शब्दचि निघतां ॥ बोध होय पावित्र्याचि जनता ॥ पावित्र्यापदिं त्रिभुवन रुळतां ॥ मग कोण पुसे स्वर्गातें ॥ कथीं० ॥ १९ ॥ सर्व साक्षिनें वरिली त्याची ॥ भोग्य वस्तु न च स्त्री इतरांची ॥ म्हणे अन्नपूर्णा जननि जगाची करु रक्षण अधिकारातें ॥ कथीं जननी उपायातें ॥ स्त्री शुचिता हो सम वच ते ॥ २० ॥

# गाणें १० वें, कात्यायनीव्रत.

चाल—कमलनयन भुजगशयन

देइं चिरें इंदुवदन शामसुंदरा ॥ गोपिहृदयकमलकोष-वासि मधुकरा ॥ धृ० ॥ पूर्व दिशे विलसतसे शुक्रचांदणी ॥ चंद्रकोर पश्चिमेसि जात पाहुनी ॥ यमूनेसि स्नाना येति गोपकामिनी ॥ तारा प्रतिबिंब खुलवि उदकिं अंबरा ॥ देइं० ॥ १ ॥ शीण मळ आलस्यादि दोष निरसुन ॥ स्नानें शुद्ध गोपिकांचें जाहलें मन ॥ सत्वबुद्धि उपजे भक्ति गाति हरिगुण ॥ गातां प्रेम ध्यान लागे शीघ्र अंतरा ॥ दे० ॥२ ॥ ध्यातां देव दूर नसे पातले हरि ॥ जळीं स्थळीं काष्टिं तेविं यमुनेतिरीं ॥ लीलाविनोदानें बोध निजजना करी ॥ वृक्षिं सकल घेउनि चढे चोळ्या अंबरा ॥ दे०॥ ३ ॥ मुरलिनादें गजबजोनि व्रजवासिनी ॥ तिरीं वस्त्रें नेसावया पाहाति धावुनी ॥ न देखतां जीवनि त्या लपति जाउनी ॥ लज्जा प्राणदान वस्त्रें देइं गिरिधरा ॥ दे० ॥ ४ ॥ गोपि म्हणाति कमलगात्र चंद्रशालका ॥ अर्जुनासि विविधज्ञानयोगबोधका॥ ग्राम्य विनोदानें कीर्ति मळवितोस कां ॥ त्रिविध लोक शब्ददोष घेशि कां शिरा ॥ दे० ॥ ५ ॥ स्नानें करुनि का-त्यायनिव्रत करूं हरि ॥ वालुकेचि अंबा पुजूं ह्या नदीतिरीं॥ व्रतभंग होइल वस्त्रें देइं सत्वरीं ॥ नियम चालविणें एक

मास हा पुरा ॥ दे० ॥ ६ ॥ व्रतनियमयोगें करुनि षड-
रिदमन तें ॥ चित्त शुद्ध होतां कळे आत्मरूप तें ॥ स्त्रिया
पुरुष देहभेद कायसा तिथें ॥ लज्जा मोह त्यजुनि करणें
प्रणाति दिनकरा ॥ दे० ॥ मधूविवर वृक्षशाखे वरति लागले ॥
काळें मोहनाम नष्ट होय मधु गळे ॥ आदि अंतिं मध्यें
शाखा स्वरूप ना ढळे ॥ व्यापुनियां आत्मा असे तेंविं अं-
तरा ॥ दे० ॥ ८ ॥ विश्वचैतन्यांश मी हें चित्तिं बाणतां ॥
विषय वीसरोन वरी चित्त सभ्यता ॥ विमलप्रेम अन्नपूर्णा
दाटे तत्त्वतां ॥ जनीं जनार्दन भाव नाहिं दूसरा ॥ दे० ॥ ९ ॥

## गाणें ११ वें, गणपति.

चाल:—नच सुंदरि करुं.

नमुं तुजला गजतुंडा ॥ विद्वन्मणिमार्तंडा ॥ धृ० ॥
ठेवुनियां पदिं माथा ॥ मागतसें भगवंता ॥ देइं मती तव
गीता ॥ गाइन गुण-पोवाडा ॥ नमुं० ॥ १ ॥ नाम तुझें मंगल
तें ॥ रूपहि मंगल दिसतें ॥ मोहिशि तांडव नृत्यें ॥ नभिं
सकलहि सुरवर ते ॥ वसनावर झळझळते ॥ मणिमय फणि-
वर वेढा ॥ नमुं० ॥ २ ॥ तवपदपंकजिं रमले ॥ ते ज्ञाना-
मृत न्हाले ॥ वेदिं अथर्वाणिं कथिले ॥ उपासनाविधि सगळे ॥
अन्नपूर्णे मुळिं न कळे ॥ तव पद वांछित मूढा ॥ नमुं० ॥ ३ ॥

## गाणें १२ वें, गजानन.

चाल—राधाधरमधुमिलिंद.

भक्तिप्रिय भगवंत गजानन ॥ धृ० ॥
भजुनि तयाला जड मूढ पामर झाले विद्यावंत ॥ गजा० ॥
धरा-अमर धरणीधर सुरवर नेति म्हणति श्रुति अंत ॥ग०॥
कर्णी कुंडलें मणिमय डुलती वासुकि आणि अनंत ॥ ग० ॥
निराकार तो सगुण जाहला ताराया जगिं संत ॥ गजा० ॥
म्हणे अन्नपूर्णा कीर्ति अशी तव कां बघशी मम अंत ॥ ग० ॥

## गाणें १३ वें, दत्ताच्या पादुका.

चाल—पोरांसह थोर किती.

॥ तारक ह्या सद्गुरुच्या दिव्य पादुका ॥ धृ० ॥
दत्तगुरू दत्तगुरू ॥ अखंडीत नाम स्मरूं ॥ सत्य शरण-
कल्पतरू ॥ होय भाविकां ॥ तारक० ॥ १ ॥ दत्तनाम
सौख्यधाम ॥ शीघ्र करिल पूर्ण काम ॥ भवतप्तां जणुं आ-
राम ॥ पुष्पवाटिका ॥ तारक० ॥ २ ॥ तापत्रय मूर्तिमंत ॥
पाहताति पुरा अंत ॥ तूं सद्गुरु कृपावंत ॥ धावशी न कां ॥
तारक० ॥ ३ ॥ अन्नपूर्णा हीन दीन ॥ गुरुकृपाजलविहीन ॥
तळमळ करि मीन होइं मेघ चातका ॥ तारक० ॥ ४ ॥

# गाणें १४ वें, कृष्णलीलामृत.

चाल–गुरु दत्त दिगंबर बनमो

श्रीहरि लीलामृत गातां ॥ दाटतें प्रेम अती चित्ता ॥ धृ० ॥ अक्रूरानें कंसाज्ञेनें कृष्ण मथूरे नेला ॥ प्रेमभक्तिनें व्रजनारी त्या वर्णिति गोविंदाला ॥ श्री० ॥१॥ श्याम मनोहर पीतांवरधर कौमोदकि करिं धारी ॥ अघ बक केशी कंस पूतना दानवमदसंहारी ॥ श्री० ॥ २ ॥ राधेगेहीं तरुणचि होई क्रीडा करि तिजसंगें ॥ माते जवळी घेवुनि आली चंद्रबिंब तें मागे ॥ श्री० ॥ ३ ॥ धुंडिति मुनिजन दुर्लभ त्यां तो नंदगोधनें चारी ॥ लक्ष्मीपति जो पयोधिवासी करितो गोरसचोरी ॥ श्री० ॥ ४ ॥ गोवर्धन गिरि नखाग्रिं जाणें सप्तदीनवरि धरिला ॥ द्वादश गांवें गिळोनि अग्नि अजगर राक्षस चिरिला ॥ श्री० ॥ ५ ॥ विधि-इंद्राचा गर्व हरी तो ऐसा विक्रमशाली ॥ ज्यास वर्णितां श्रुतिही शिणल्या नेति बोलती बोली ॥ श्री० ॥ ६ ॥ कुंजवनीं तो शशिवदनानें मंजुळ वाजवि मुरली ॥ विनोद चेष्टा दावुनि असुची चित्तवृत्ति ही हरिली ॥ श्री० ॥ ७ ॥ रासमंडळीं रतिक्रीडेनें सकल गोपिका सुखवी ॥ ब्रह्मचर्य व्रतसंकल्पानें ब्राह्मणप्रेतहि उठवी ॥श्री० ॥ ८ ॥ भक्तसंकटीं उडी घालितो कीर्तनरंगीं नाचे ॥ अन्नपूर्णा अति प्रेमेंकरुनी गाई गूण तयाचे ॥ ९ ॥

# गाणें १५ वें, तुळशीदास.

चाल— ( चंद्रकांत राजाची० )

हस्तकिं धरुनी मंचकिं बसवी तुलसिदासकांता ॥ कैसे कोठुनि मध्यरात्रिं या आलां प्रियनाथा ॥ वसन भिजुनियां चिंब जाहला कटि भरजरि शेला ॥ मंदिल भिजुनी गौर तनूवरी लाल रंग गळला ॥ काय उतरलां यमुनाजल हो पोहुनियां बाहीं ॥ नव्हे प्रियकरी तव नामाची नाव केलि पाहीं ॥ यमुनेमध्यें भिजतां कां नच शमता विरहाग्नी ॥ प्रेमसमुद्रा भरति लागली तव मुखशशि बघुनी ॥ प्रातःकालीं विपिनविहारा भूपतिनें नेलें ॥ रामायण मम काव्य ऐकुनी भूप तुष्ट झाले ॥ मुलुख महाल मोकासे इच्छित माग म्हणे कांहीं ॥ तव भेटीची आज्ञा मागुनि आलों लवलाहीं ॥ वनकलिकांची गुंफुनि आणिली तुजसाठीं माला ॥ जननि-गेहिं तूं आलिस लोटुनि विरहि वल्लभाला ॥ एक वेडिनें गोवियले जणुं तस्करसे दोन्ही ॥ बद्ध असावे सतत प्रियकरा कां पतिपत्नींनीं ॥ नव्हे प्रेम हें खचित विषयिंची लंपटता गमते ॥ मनें एक मग शरिर असेना कोठें कां परतें ॥ हंसुन म्हणे हो नगरामध्यें मजसम नच मिळती ॥ रुका वेचितां रंजन करिती दावुनि अति प्रीति ॥ तुजसम सुंदर कामिनि म्हणुनी होशिल कां तूं ती ॥ मत्स्य जीवनीं क्रीडति ते न

च घृतदुग्धीं जगती ॥ अचुक महालीं कसे पातलां नवल गमे मजला ॥ सेवक निजले अडसर लावुनि देवडि दाराला ॥ पुरे करीं हा विनोद सुंदरि आलिंगन देईं ॥ विरहानल हा ताप देतसे तुज मज सम पाहीं ॥ काय समजशी पाहिलि नाहीं तुज उची वरती ॥ मार्गप्रतीक्षा करितां श्रमालिस दोर धरुनि हातीं ॥ घोरांधारीं हास्यपूर्ण तव चमके शशिवदन ॥ सरळ नासिका ओठ पोवळीं कुंदकळ्या रदन ॥ बारिक कंबर अतिशय तरि ही दुरुनि मला दिसली ॥ गगनिं तारकादीप्ति लोपविल गौरकांति असली ॥ केशभार जरि अंधाराशीं एकरूप झाला ॥ वक्र भ्रुकुटिसह मज मृगनयने अति सुंदर दिसला ॥ कवित्वलाघव पुरे प्रियकरा विनोद हा भलता ॥ दोर टाकिला कुभांड नसतें हांसति जन वदतां ॥ आगमनाची वार्ता नसतां वाट केंवि पाहूं ॥ छपुनि कासया तत्पर राहाती मायबाप भाऊ ॥ दांपत्याच्या शुद्ध प्रीतिचें कौतुक नच कवणा ॥ वर्णनीय तो विषय मनोरम होतो कविसुजनां ॥ वाद कशाला दोर टांगिला कुठे मजासि दावा ॥ कृष्ण भयंकर सर्प देखतां हाय म्हणे देवा ॥ अंग थरारे दृष्टि भोवली झणिं मूर्च्छित झाली ॥ पडतां सांवरि तुळशिदासप्रभु मंद वात घाली ॥ काय कसी हो सुंदर ललना लोळति या चरणीं ॥ ओवाळुनि किति जाउं इच्छिती गुणरूपावरुनी ॥ प्राणसंकटें गणिलीं नाहीं या अबलेकारितां ॥ काय तारितें कालिंदीजल महापुरीं बुडतां ॥ कठिण प्रसंगीं

कोण हरिविणें नक्र जरी गिळिता ॥ व्याघ्र भक्षिता तस्कर वधिता सोडविति न कांता ॥ सर्प डंकिता अनर्थ होता हरहर भगवंता ॥ रक्षिलि त्वां मम सौभाग्याची विमल प्रेम-सरिता ॥ नातरि होती भेट कशाची प्रिया राहाति महालीं ॥ देह त्यागितां घेउनि जाणें कर्म-जोड अपुली ॥ सुखद न होई क्षुल्लकतेचें अति जडतां प्रेम ॥ प्रिया भेटते अशा भक्तिनें विश्वव्यापि राम ॥ धन्य माऊली तव पदकमलीं ठेवितसें माथा ॥ रुदन करी सति रघुविर-शोधा तुळशिदास जातां ॥ म्हणे अन्नपूर्णा कुलस्त्रि-प्रेमें तुळशिदास तरले ॥ अभिनव सुरसचि हिंदिभाषणीं रामायण केलें ॥ सर्प डसेना जल बुडवीना दिव्याद्भुत शक्ती ॥ प्रेमें गीत गा बंधुभागिनिनो त्यजा कपटवृत्ति ॥

## गाणें १६ वें, सुलोचना.

चाल :—चंद्रकांत राजाची कन्या.

युद्धामध्यें सौमित्रानें इंद्रजीत वधिला ॥ सुलोचनेला असा मंदिरीं वृत्तान्तहि कळला ॥ सती जावया सिद्ध जाहली पुसे रावणाला ॥ रघुविरसैन्यामध्यें जातें पतिशिरशोधाला ॥ ॥ चाल ॥ म्हणे रावण कैसें करशिल गे तुजप्रती ॥ जरि वध्द करुनियां ठेविल तो रघुपती ॥ सती बोलली काय राघवा हें ठाउक नाहीं ॥ परास्त्रियेच्या अभिलाषानें कुलक्षय

होई ॥ ध्रु० ॥ १ ॥ पतिव्रतेचे वचनें हृदयीं रावण खोंचला ॥ दलभारासह आज्ञा देई जावयास तिजला ॥ म्हणति पाठवी हतबल होउनि रावण सीतेला ॥ इंद्रजिताची कांता म्हणुनी बिभीषण बोलला ॥ चाल ॥ मग वानर म्हणती जैशा तैसें अतां ॥ हिस जाउं न द्यावी जोंवरि देइ न सिता ॥ राम बोलिले सच्छिल त्यजुनी व्यर्थ जिणें काई ॥ पर० ॥ २ ॥ परस्त्रियेला पाहावयाला वक्र नेत्र केला ॥ गृहकलहाच्या सर्पा त्यानें बळें चाळवीला ॥ ज्याच्या योगें धूळधाण ही गुरुतर राष्ट्रांची ॥ साक्ष पहा ही अजवरि झाली किति इतिहासाची ॥ चाल ॥ यासाठिं वीरहो परक्यांच्या बायका ॥ तुम्हीं जगज्जननिसम मनीं मानण्या शिका ॥ अशा नीतिनें सात्त्विक प्रेमा कुटुंबांत राही ॥ पर० ॥ ३ ॥ सीताविरहें श्रीरामाचा देह क्षीण झाला ॥ सुलोचना सति पाहुनि उपजे मातृभाव त्याला ॥ शीर देउनी चीर कंचुकी बोळविलें तिजला ॥ रणांगणीं त्या प्रेमें घाली कीर्ति विजयमाला ॥ चाल ॥ उत्कर्षबीज हें नीतीमध्यें असे ॥ श्रीराम सुखानें दंडकवनिंही वसे ॥ म्हणे अन्नपूर्णा सौख्यासाठीं सेवा नीती ही ॥ परस्त्रियेच्या अभिलाषानें कुलक्षय होई ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २५६८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# गाणें १७ वें, रामाचें.

चाल—साधे सुर साधे.

रामा ये रे ये ॥ देईं देईं दर्शनास ॥ रामा ये० ॥ धृ० ॥ षड्रिपू माजले ॥ चित्त विषया भुले ॥ भजन पुजन सुचुं न दे ॥ रामा० ॥ १ ॥ प्राण हे जोंवरी ॥ वसति देहान्तरीं ॥ सुरम्य सुमुख न्याहाळुं दे ॥ रामा० ॥ २ ॥ तारियेली शिला ॥ मीच कां जड तुला ॥ पदाब्ज सुरज उधळुं दे ॥ रामा० ॥ अन्नपूर्णा तुतें ॥ निशिदिनीं अळविते ॥ जनन मरण चुकवुं दे ॥ रामा ये रे ये ॥ ४ ॥

# गाणें १८ वें, मंगलागौर

चाल—भक्ता तुमच्या काजा.

केलें देहाचें देउळ ॥ हृदयकमळ अष्टदळ ॥ देवी तेथें सुनिमळ ॥ ध्यानीं आणिती ॥ अंबे तुला ओवाळितें मंगलारती ॥ धृ० ॥ १ ॥ प्रेमस्नेहें मर्दियेली ॥ भक्तिजलें न्हाणियेली ॥ चिदंबरें नेसविलीं ॥ उंचि बहुत तीं ॥ अंबे० ॥ २ ॥ हळदीकुंकूं द्वइताचें ॥ ज्ञानांजन नेत्रि तिचे ॥ वाण मोद-मोदकांचें ॥ नाहीं कमती ॥ अंबे० ॥ ३ ॥ षोडश तत्त्वें उपचार ॥ घेइं विधीपुरःसर ॥ धरी रूप चराचर ॥ मूळ

प्रकृती ॥ अंबे० ॥ ४ ॥ आत्मरूपीं जागरण ॥ निद्रा लागे म्हणवून ॥ सगुण गूण सुकीर्तन ॥ मुखें वर्णिती ॥ अंबे० ॥ ॥ ५ ॥ काम क्रोध अहंकार ॥ निर्माल्य हा केला दूर ॥ विसर्जनीं प्रलयजलीं ॥ गुप्त होय ती ॥ अंबे० ॥ ६ ॥ ऐसी पूजा घडे त्यासी ॥ देशी रूप सौभाग्यासी ॥ अन्नपूर्णा माते तुजसी ॥ होय वंदिती ॥ अंबे० ॥ ७ ॥

## गाणें १९ वें, लोपामुद्रा.

चाल—शंभो शिवहर करुणा.

रामा मधुतर लीला सुखकर किति तुझिया ॥ सीता अति प्रिय रामा ॥ धृ० ॥ सागरिं पर्वत तारियले ॥ रावण मारुन सीता घेवुन येतां रघुपति बोले ॥ १ ॥ अगस्ति-आश्रमिं दर्शना ॥ जातां सीते तद्भार्येतें कथिं न सेतुवृत्ताला ॥ २ ॥ मुनिवर सन्मुख येउनियां ॥ बहु सन्मानुनि आश्रमिं नेउनि वंदिति परस्परांतें ॥ ३ ॥ लोपामुद्रा चतुर सती ॥ षड्रस भोजन सत्वर घालुन करि प्रिय भाषण मग ते ॥ ४ ॥ श्रमहर करि उपचारांतें ॥ सांगें सीते सुखदुःखातें दिवस कसे वनिं गेले ॥ ५ ॥ चौदा वर्षें अति मोदें ॥ लघु दिन वाटति स्वामीसंगतिं अति प्रेमें वागविलें ॥ ६ ॥ कांचन-मृगकंचुकि म्हणतां ॥ रघुविर पाठीं जातां कपटी रावण नेइ मला गे ॥ ७ ॥ शोक करित मज शोधियलें ॥ वानरहातीं

सेतु बांधिती नवल दगड जलिं तरले ॥ ८ ॥ नवल सांगशी सेतुकथा ॥ जीचा भर्ता होय प्राशिता चुळभर अंभोधीतें ॥ ॥ ९ ॥ लोपामुद्रा अभिमानें ॥ प्रयास करिती कां रघुपती पथ झणिं मम पति देते ॥ १० ॥ राघव क्षाराब्धी म्हणतां ॥ द्विज क्षार मूत्र जे सीता उमजे म्हणे कपि न शिवति त्यातें ॥ ॥ ११ ॥ नातरि सप्ताब्धी पीते ॥ अहंकृति टाकून करी पद वंदन अतिलीन अन्नपूर्णा ते ॥ रामा ॥ १२ ॥

# गाणें २० वें, पार्वतीगर्वहरण.

चाल—हा चतुर्भुज सांवळा.

भव शरणजन हारि हा रघुनाथ ॥ ध्रु० ॥
पार्वति पुसते श्रेष्ठ तुम्हांहुनि ॥ कोण प्रिया जगतांत ॥ १ ॥
सीताविरहें वेडा होउनि ॥ भटकत हिंडे वनांत ॥ २ ॥
ध्यानिं काय त्या प्रसन्न करणें ॥ भुलवुनि आणितें क्षणांत ॥ ३
मूर्च्छित झाले राम आठवुनि ॥ प्रिया जानकी मनांत ॥४॥
म्हणे लक्षुमण पातली रामा ॥ जानकी अकस्मात् ॥ ५ ॥
सीता असतां धरुनि तरुलता ॥ कां करितां आक्रांत ॥ ६ ॥
पत्नीचें पद वंदन करितां ॥ भ्रम झाला चित्तांत ॥ ७ ॥
विश्वजननि सौमित्रा पुजुनी ॥ पुण्य घेइ पदरांत ॥ ८ ॥
शंकर म्हणती आणिलेस गिरिजे ॥ कोठें सीताकान्त ॥ ९ ॥
कपटि ढोंगियां राघव न भुले ॥ भक्ति न ज्या हृदयांत ॥

चिद्घन रामा अलिप्तसा तूं ॥ कमलपत्र उदकांत ॥ ११ ॥
अन्नपूर्णा अति प्रेमें त्याचें ॥ नाम स्मरे चित्तांत ॥ १२ ॥

## गाणें २१ वें, रामाचें.

चालः—तों तननन वेणू.

तूं भज भज श्री रघुनाथा ॥ सीताकांता रावण वधिता
बिभिषणप्रति पददाता ॥ तूं० धृ० ॥ १ ॥ विमलसुचरिता
गौतमवनिता उद्धरि पदरज पडतां ॥ तूं० ॥ २ ॥ अति
सुखदाता संकटहर्ता तारिल भवाब्धि पुरता ॥ तूं० ॥ ३ ॥
म्हणे अन्नपूर्णा दाखविं चरणा अक्षय ठेविन माथा ॥ तूं० ॥

## गाणें २२ वें, हरतालिका.

चाल—ही मुरली गुंगवी.

मज कैसे जोडती ॥ हे पद सुंदर सुखकर सुरनर मुनि-
वरही वांछिती ॥ मज० धृ० ॥ १ ॥ हिमनगकन्या होउनि
केलें ॥ बहु तप त्वां पार्वती ॥ मज० ॥ २ ॥ पाहुनि पितया
कुतुहल वाटे ॥ हो पुसता मुनिप्रती ॥ मज० ॥ ३ ॥ सांगा
स्वामी योग्य असे जरि ॥ वर इजला या क्षिती ॥ मज ॥४
नारद बोले विष्णुसि देई ॥ तवकन्या निश्चिती ॥ मज० ५
ऐकुनि जासी तपोवना तूं ॥ शोधि पिता तुजप्रती ॥ म० ६

शंभुवांचुनी सकलहि ताता ॥ तुजसरिसे भासती ॥मज० ७
हरतालीका व्रतयोगानें ॥ त्वां वरिलें मजप्रती ॥मज०॥८॥
पूजिति नारी सखिसह तुजला॥ सौभाग्या लाधती ॥ ९ ॥
इहसुख भोगुनि म्हणे अन्नपूर्णा ॥ सद्गतिला पावती ॥१०॥

## गाणें २३ वें, सत्याचा महिमा.

चाल—सुनो सुनो.

त्यजीं अनृतभाषण पाप ॥ करि सत्याचि मनुजा विजयी॥
कोणी राजा नगरप्रदेशीं ॥ हिंडतां पंच चोरांशीं ॥
देखता होय दृष्टीसी ॥ तो खुणाविता त्या होई ॥ १ ॥
ये जवळी तस्कर-मेळा ॥ वाजती पायिं शृंखला ॥ म्हणे राव
बाप तुम्हाला ॥ ही स्थिती प्राप्त कां होई॥ त्यजीं० ॥ २ ॥
म्हणे पहिला तस्कर राजा ॥ अपराध नसे मुळिं माझा ॥
गेला करुनी लबाड दूजा ॥ मज पोलिस पकडित पाहीं ॥३॥
मग दुसरा तस्कर बोले ॥ संगाती लबाड अपुले ॥ आणोनि
सर्वें फसवीलें ॥ मज कावा ठाउक नाहीं ॥ त्यजीं० ॥ ४ ॥
बोले तिसरा त्याच्या पुढती ॥ अधिकारी वांकडे असती ॥
कायदा कीस काढीती ॥ मज घालिति कारागृहीं ॥ ५ ॥
तैं चवथा तस्कर वदला ॥ दायाद् असति बहु मजला ॥
मजवरी पुरावा केला ॥ ते एकवटुनि सर्वही ॥ त्यजीं ॥ ६ ॥
पांचव्यानें कारण कथिलें ॥ तो म्हणे द्रव्य चोरीलें ॥

भोगितों कर्मफल अपुलें ॥ मम बोल कुणाला नाहीं ॥ ७ ॥ सेवकांसि राजा सांगे ॥ रक्षावे सज्जन चवघे ॥ हा चोर घालवा वेगें ॥ काढोनि विड्या लवलाहीं ॥ त्यजीं० ॥ ८ ॥ तापलें हृद्य अनुतापें ॥ तो पुनरपि न करी पापें ॥ बोलतां सत्य ये सोपें ॥ अति मंद अन्नपूर्णेही ॥ त्यजीं० ॥ ९ ॥

## गाणें २४ वें द्यूतविनोद.

चाल—असा धरिं छंद.

द्यूतीं शिव हरला ॥ गिरिजेनें डाव जिंकीला ॥ विनोदप्रेमें वदे पार्वती ॥ पुरुष गर्व बहु वाहति चित्तीं ॥ अबला मूढा स्त्रियांसि म्हणती ॥ कसे हो हरलां ॥ शिव ऐकुनि क्रोधें भरला ॥ धृ० ॥ १ ॥ विनोदं नेणुनि पशुपति रुसला ॥ विपिनीं जाउनि तपासि बसला ॥ स्त्रीसंगतिला पुरता विटला ॥ उदासिन झाली ॥ शैलजा काननीं गेली ॥ २ ॥ शबरिवेष धारि जगदंबा ती ॥ नाजुक पिवळी शुभांग कांती ॥ मुक्त केश पाठीवर रुळती ॥ हार घातला ॥ मोत्यांचा हृदयीं बहु खुलला ॥ ३ ॥ शुभ्र शालु नेसलि जरिकांठी ॥ हिरवी भरजरि कंचुकि उलटी ॥ टिकली सुंदरशी लल्लाटीं ॥ नथ सरजाची ॥ झबदार मुक्तकरणीची ॥ ४ ॥ हंसगतीनें चाले रमणी ॥ मंजुळ वाजती नूपुर चरणीं ॥ शिवहस्ताकिंची गळली स्मरणी ॥ मोहित झाला ॥ आसनावरुनि झणिं उठला ॥ ५

पाहत नेत्र उघडुनि मदनारी ॥ सौदामिनिसम चपल सुंदरी ॥ अचुक नेम पक्ष्यांवरती धरी ॥ गंध अंगींचा ॥ जणुं वसंत प्रगटे साचा ॥ ६ ॥ सिंहकटी अति स्वच्छंदें विलसे ॥ नव तारुण्यें लवली भासे ॥ घर्मबिंदु मिरविति सुंदरसे ॥ गुलाबी गालीं ॥ मुखकमलकळी विकसीली ॥ ७ ॥ पक्षिनिमित्तें ते हरिणाक्षी ॥ नेत्रकटाक्षें शिवासि लक्षी ॥ स्मित करुनीयां मुरडी मुखशशी ॥ तल्लिन झाला ॥ शिव कुसुमशरें अति खिळला ॥ ८ ॥ कोण कुठिल एकलि कांतारीं ॥ गमसि हिंडतां श्रमलिस भारी ॥ पुष्पें गळलीं शिरिंचीं सारीं ॥ आसनावरती ॥ ये बैस घेइं विश्रांति ॥ ९ ॥ चंद्र चंदना सुधारसाहुनि ॥ दर्शन शीतल तुझें कामिनी ॥ हृदयिं भडकला बघ मदनाग्नी ॥ शांत कर त्याला ॥ आलिंगन देई मजला ॥ १० ॥ इंद्रियनिग्रह आधिं न करितां ॥ व्यर्थ तामसी तप आचरितां ॥ असुनि आपली सुंदर कांता ॥ सोडिली तिजला ॥ ओळखितें मी तुम्हाला ॥ ११ ॥ नगदुहिता ती निष्ठुर मोठी ॥ ब्रह्मांडाच्या करी खटपटी ॥ नलगे कवटाळिण ते दृष्टी ॥ वरिन मी तुजला ॥ पात्र तूं गमसि प्रेमाला ॥ १२ ॥ अनंत ब्रह्मांडाची स्वामिनी ॥ हिंडतसां वनिं तीतें त्यजुनी ॥ मजला गमतां अरसिक स्वमनीं ॥ पाच सोडीली ॥ कशि कांच मना आवडली ॥ १३ यज्ञकुंडिं निजदेह जाळिला ॥ दक्ष पिता अपुला मारविला ॥ काय पतीची पर्वा तिजला ॥ वधी दैत्यासी ॥ पण करुनि

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.

जिंकिलें मजसी ॥ १४ ॥ परस्त्रिलोभें होय अनर्थ ॥ तप तुमचें हें जाइल व्यर्थ ॥ प्रपंच साधे ना परमार्थ ॥ उमजा आतां ॥ सावध व्हा नातरि फसतां ॥ १५ ॥ परस्त्रि-शंका सोडुनि देई ॥ माळ घाल अर्धांगीं राहीं ॥ भूमि सूर्य साक्षीनें घेई ॥ न त्यागीं म्हणुनी ॥ वचन हें प्रतिज्ञा करुनी ॥ १६ ॥ दोन वेळ दुर्गेनें वरिलें ॥ द्यूत खेळुनी पूर्ण जिंकिलें ॥ अपराधाविण तिजशिंहि त्यजिलें ॥ अशांची प्रीति ॥ मज नलगे फसविल पुढती ॥ १७ ॥ प्रथम सुरेची चटक लागली ॥ कीं वेश्येवर प्रीती जडली ॥ सुविचारें मग वाइट कळली ॥ द्यावि सोडोनी ॥ तशि तिला त्यजिलि तुज वरुनी ॥ १८ ॥ मजहुनि सुंदर पाहतां कोणी ॥ जाल तिजसवें मज टाकोनी ॥ धुंद सदा भांगेच्या व्यसनीं ॥ भरवसा कैंचा ॥ मज नको संग मुळिं तुमचा ॥ १९ ॥ बहुपुष्पांवरि भ्रमरहि भ्रमती ॥ कमलिनिवरुनी परि न च उठती ॥ संकटिं पडुनी प्राणहि देती ॥ होय रसिकांची ॥ सत्पात्रिं प्रीति दृढ साची ॥२०॥ भ्रतार माझा अति बलवंत ॥ असेल या वनिं मज लक्षीत ॥ जाळिल ब्रह्मांडासि समस्त ॥ करिल शिक्षेला ॥ व्हा दूर जाउं द्या मजला ॥ २१ ॥ शंबरासुरा जाणें वधिलें ॥ वागविराला वाणीं खिळलें ॥ मदन त्रासवी जो जग सगळें ॥ तोहि जाळीला ॥ तव पती कायसा मजला ॥ २२ ॥ निज मुखिं कथितां प्रताप बहु परी ॥ द्यूतीं आणिली गिरिजेनें हारी ॥ कटाक्ष संधानिं विंधिति नारी ॥ असे पुरुषार्थी ॥ खरि होइल

अपुली ख्याती ॥ २३ ॥ मदन एकदा भस्म मिं केला ॥ तव मुख-इंदु अमृत वर्षला ॥ सजीव होउनि घे उसन्याला ॥ जाळि तो मजसी ॥ त्याजिं लाज जवळिं ये सरशी ॥ २४ ॥ भिल्लिण स्त्री मी असे रानटी ॥ अति कामानें काम हि आटीं ॥ बोलि खपेना मजसि चावटी ॥ जातें भुवनाला ॥ साजे तुमचें तुम्हाला ॥२५॥ हळु हळु चाले उभी न राही ॥ भुलवुनि शिव कैलासा नेई ॥ करि अन्नपूर्णा वंदन पायीं ॥ हर्ष बहु झाला ॥ वर्णितां शेष तो शिणला ॥ २६ ॥

## गाणें २५ वें, गोरा कुंभार.

चाल—मुद्रिके अगोचर०

सद्भक्त-चरित्रामृता जाय भव-व्यथा ऐकतां ते ॥ हरि पदीं प्रेम जडतें ॥ धृ० ॥ तरढोकि जयाचें ग्राम ॥ गोरया-नाम कुलालातें ॥ करि कुंभ मृत्तिकेतें ॥ तुडवितां स्त्रियेशी झणीं ॥ म्हणे जल आणिं घाल वरतें ॥ सांभाळा म्हणे शिशुतें ॥ चाल ॥ ब्रह्मांडहि संरक्षितो ॥ रक्षितो ॥ स्तंभा-विण नभ धरितो ॥ धरितो ॥ चाल ॥ जो उदकिं तारितो मही ॥ काय तो नाहिं शिशू जवळी ॥ सप्रेम दृष्टि न्याहाळी ॥ स० ॥ १ ॥ चालली सती उदकास ॥ हरी भजनास ॥ पती लागे ॥ सप्रेम अंतरंगें ॥ तल्लीन जाहल्या वृत्ती ॥ न राहे स्मृती ॥ शिशू रांगे ॥ नाचतां तुडवी अंगें ॥ चाल ॥ सती

मूर्च्छित हो क्षणभरी ॥ क्षणभरी ॥ संतप्त निंदिते हरी ॥
श्रीहरी ॥ चाल ॥ ब्रह्मांड रक्षि तत्त्वतां ॥ कुठे तो अतां ॥
देव सांगे ॥ या समई भीक मागे ॥ स० २ ॥ वर्णिते विश्व
वदनीं ॥ ब्रह्मनंदिनी सतत जातें ॥ कीं व्यास वाल्मीकी तें ॥
महाकवी प्राप्त हो पदवी ॥ नेति जो म्हणवी ॥ सकल श्रुति
ते ॥ महिधरा मौन पडतें ॥ चाल ॥ म्हणे पुरे ईश वर्णना ॥
वर्णना ॥ हो वृश्चिकव्रणवेदना ॥ वेदना ॥ चाल ॥ कोकील
पुष्पवाटिके तसें कौतुकें बाळ खेळे ॥ निर्दया तूडवीलें ॥
सद्भक्त० ॥ ३ ॥ संसारिं पाणी घालून देव शोधून काढि-
लाती ॥ ऐकिली त्याची कीर्ति ॥ जे करिति याचें भजन
नुरे तनुभान पिसें होती ॥ निज प्रपंचास मुकती ॥ चाल ॥
तुम्ही परशुदंड जाहलां ॥ जाहलां ॥ निज वंशवृक्ष खंडि-
ला ॥ खंडिला ॥ चाल ॥ जिववील पुत्र मागुती ॥ नको
करुं खंति धृजि जिवती ॥ पंढरीवासिनी ती ॥ सद्भक्त० ॥४॥
मागतां अल्पसें क्षीर देइ सागर बैसवीती ॥ ध्रुव अढळ
पदावरती ॥ तो देव कर्मचांडाळ तुडवितां बाळ काय मेला ॥
कीं मद्य तुम्ही प्यालां ॥ चाल ॥ रविमंडाळिं फुंकी धुळी ॥
जो धुळी ॥ ती पडे स्वमुखकमळीं ॥ कमळीं ॥ चाल ॥ दे-
वासि नसे गे मरण करुनि यत्स्मरण बहुत तरले ॥ तव
मरण जवळि आलें ॥ स० ॥ ५ ॥ संसार दुःखमय फार ॥
मूढ अविचार जना भक्ति ॥ शांति दे शिकवि नीति ॥ ई-
श्वरी नसे प्रमेय ॥ अनर्थ अन्याय सकल करिती ॥ बळि

दुर्बळासी बधिती ॥ चाल ॥ त्या निंदिशि प्रभुकारणें ॥का-
रणें ॥ तुज योग्य जिवें मारणें ॥ मारणें ॥ चाल ॥ धांवला
दंड घेऊन आण घालून विठ्ठलाची ॥ लावा न हात मजसी
॥ स० ॥ ६ ॥ पावली खेद मग फार ॥ म्हणे संसार बुड-
विला मीं ॥ शिर ठेवि चरणयुग्मीं ॥ मम भगिनी चतुर शा-
हणी ॥ असे बहुगुणी वरा तुम्ही ॥ प्रार्थितें पित्याला मी ॥
॥ चाल ॥ तो कन्या अर्पुनि म्हणे ॥ हो म्हणे ॥ तुम्हि भक्त
शांत शाहणे ॥ शाहणे ॥ चाल ॥ तिजपरि हिजशि ममता
चित्तिं समता वागवावी ॥ हरिचरणशपथ वाहावी ॥ स० ७॥
गोरया वरं हांसून म्हणे बंधन देव छेदी ॥ निजजनाच्या
उपाधी ॥ कामिनी कष्टि होऊनी योजिती मनीं युक्ति हातीं
निशीमधें धरीताती ॥ चाल ॥ हो जागृत बहु घाबरे ॥
बावरे ॥ मोडिली शपथ निजकरें ॥ निजकरें ॥ चाल ॥
तोडून टाकिले हात पंढरी जात भजन करितां ॥ टाळिया
पिटूं पाहातां ॥ स० ८ ॥ देवानें दीधले हात ऐकुनी मात ॥
ज्येष्ठ कांता ॥ हरिपदीं ठेवि माथा ॥ दे चरण प्रेम आस्वाद
संसृतीवाद बहुत केला ॥ तुजवीण शीण झाला ॥ चाल ॥
भो तव पदकमलातळीं ॥ रे तळीं ॥ मी मंडुकि रुतले मळीं
॥ तममळीं ॥ चाल ॥ दे बाळ दुडदुडां येत होय हर्षित
अन्नपूर्णा ॥ वंदिते श्रीशचरणा ॥ स० ॥ ९ ॥

# गाणें २६ वें, बहुमोल हलवा.

चाल—चंद्रकांत राजाची कन्या.

पौषमासीं संक्रांतीचा सण बरवा येतो ॥ तिळगुळ देण्याच्या रीतीनें हर्ष जनां होतो ॥ मकर राशिला रवि तो येतो पर्वकाळ त्याला ॥ म्हणती बुधजन म्हणुनी दानें देती विप्रांला ॥ तिळगुळ देण्यानिमित्त जाती निजमित्राधामीं ॥ स्नेह मनांतिल प्रकट कराया सुयोग हा नामी ॥ प्रेमपत्रिका लिहुनी कोणी तिळगुळ पाठविती ॥ वचन वदावें मधुर परस्पर सकलहि प्रार्थीती ॥ किति हौसेनें तिळ घेउनि मुलि साखर आणविती ॥ पंक करुनियां निजचातुर्यें हलवा बनवीती ॥ पीत केशरी अति सुंदरसा रंग तया देती ॥ कौतुक वाटे बघुनि तयांची मंगल ही कृती ॥ देशभगिनिनो सरलत्वाची घ्या तुम्हि साखर ॥ मळ काढुनियां सदय मनाचा पंक करा मधुर ॥ सद्गुण तिळ हे ऐक्यपणाचा अमूल्य अति हलवा ॥ सुशिक्षणानें सद्वर्तन हा रंग वरी खुलवा ॥ सण समजुनियां संक्रांतीचा नित्य गोड बोला ॥ ह्या हलव्यानें शत्रुहि मित्रचि होतिल तुम्हाला ॥ सुशब्द शांती नित्य तिथें तो वास इंदिरेचा ॥ तंटा भांडण सतत कली त्या गेहिं अवदशेचा ॥ मधुपांचा तो मधुरव ऐकुनि कमलिं वसे कमला ॥ मधु वच वदतां मधुरिपुप्रियकारि येइल सदनाला

॥ अशा रीतिनें उन्नत्तीही होइल देशाची ॥ म्हणे अन्नपूर्णा कृपा अम्हावर राहिल ईशाची ॥

## गाणें २७ वें, शंकराचें.

चाल:—श्याम चुनरियां दे दे.

शंकरा गौरिकांता ॥ तारिं तारिं या तवपद विनता ॥ भक्तसुमनवनसुखदवसंता ॥ शंकरा० धृ० ॥ दुःखि मदंतर आठवि हरहर ॥ मुख्यपडरिविर जाळि कुसुमशर ॥ तदितर पळती नामहि स्मरतां ॥ शंकरा० ॥ १ ॥ विषधर फणिवर शिरसि सुधाकर ॥ प्रलयवह्नि निर वसति निरंतर ॥ वैर विसरुनि पावलि समता ॥ शंकरा० ॥ २ ॥ सागर स्थिरतर इंदुभगिनिवर ॥ तत्पदिंचें निर गिरिशिखरावर ॥ धरिसी मस्तकिं अगम्यचरिता ॥ शंकरा० ॥ ३ ॥ हृदयसरशी प्रभु पदाब्ज सुंदर ॥ प्रेमळ हरिगुण मोद महीवर ॥ अन्नपूर्णा-मुखीं पसरवी कविता ॥ शंकरा० ॥ ४ ॥

## गाणें २८ वें, धूतपाप.

चाल—-झपा.

अतां धांवरे धांव तूं धूतपापा ॥ जन्ममरणाचिया चुकविं खेपा ॥ अतां० ॥ धृ० ॥ मृडानीचे तिरा वससि तूं

शंकरा ॥ जोडुनी द्वय करां नमित भावें ॥ अतां० ॥ १ ॥ रम्य स्वर्णाकृती ॥ जवळि तव पार्वती ॥ नांदिसह गणपती विघ्नहर्ता ॥ अतां० ॥ २ ॥ बैसवुनि अंतरीं ॥ मूर्त्ति तव साजिरी ॥ संसृती मंजिरी अर्पियली ॥ अतां० ॥ ३ ॥ निशिदिनीं अळविते ॥ कष्ट बहु पावते ॥ चरणिं तव लोळते अन्नपूर्णा ॥ अतां धांव रे धांव ० ॥ ४ ॥

# गाणें २९ वें, गजानन.

चाल—राम स्मरावा राम.

करिं मयुरेश्वरध्यान मनोहर करिं मयुरेश्वरध्यान ॥ धृ० ॥
पाशांकुशधर अतिशय सुंदर पतिवसन परिधान मनो० ॥१॥
चतुर्भुजां कडि तोडर झळकति जडित मुद्रिका छान मनो ॥२
भालिं कस्तुरी सुंदर शुंडा नेत्र जयाचे सान मनो० ॥ ३ ॥
सुहास्यवदनीं बसुनि घेत जणुं बालभानु विश्राम मनो० ॥४
हिरेजडित तीं किरिटकुंडलें झळकति दीप्तीमान मनो० ॥५॥
हृदयकमलिं कीं भ्रूमध्यस्थळिं मूर्ति करी चिंतन मनो० ॥६॥
प्रेमप्रमोदें भरे अन्नपूर्णा विसरे तनुमनभान मनो० ॥७॥

# गाणें ३०वें, नृसिंहवाडी.

चाल—शरदृतु उदय.

श्रीदत्त देखिलग बाई अति आनंद झाला हृदयीं ॥धृ०॥

स्थल सुरम्य वाडी फार ॥ जें वसे संगमावर ॥ रमणीय अति कृष्णातीर ॥ मधु निर्मल वाहे नीर ॥ श्रमहारि मंद ये समिर ॥ हर्षवी त्वरित अंतर ॥ श्री० ॥ १ ॥ बांधिला घांट मनोहर ॥ त्यावरी दत्तमंदीर ॥ सुरतरुवर औदुंबर ॥ करि छाया शीतल फार ॥ पादुका परम सुंदर ॥ यात्रेचा लोटे संभार ॥ २ ॥ पल्लवी पुजा बांधिली ॥ त्रयमूर्ति कांचनी खुलली ॥ काषाय वस्त्रिं मिरवीली ॥ दे अभीष्ट जणुं सुरवल्ली ॥ ३ ॥ अन्नपूर्णा लोळे चरणीं ॥ म्हणे आनंदवन हे धरणी ॥ पातकी पुनित हो प्राणी ॥ दर्शनें जाति उद्धरुनी ॥ श्री दत्त देखिलग बाई ॥ अति आनंद झाला हृदयीं॥

## गाणें ३१ वें, श्रीमती-स्वयंवर.

चाल—पारिजातकानिमित्त भामा०

खरतर मत्सर उभयहानिकर विष मनिं ठेवूं नका ॥ निजमनिं ठेवूं नका ॥ श्रीमती स्वयंवर आयका ॥ धृ० ॥ सूर्यवंशिं नृप अंबरिषाची पाहुनियां नंदिनी ॥ अति सुंदर नंदिनी ॥ इच्छिती नारद पर्वत मुनी ॥ राव म्हणे होउंद्या स्वयंवरिं कन्या उभयांतुनी ॥ वरिल उभयांतुनी तया मी दान करिन तत्क्षणीं ॥ चाल ॥ करिं देवा मर्कट तदा पर्वत मुनी ॥ वानरसा नारद दिसो तो म्हणे मनीं ॥ चाल ॥ चिंतित पावति नोवरि मंडपिं घेउन ये मालिका ॥ करिं घेउन

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.

मालिका ॥ श्रीमती० ॥ १ ॥ गुलाबं मधु सुमनाकं तिच्या जणुं गालीं भरला दिसे ॥ गालीं भरला दिसे ॥ वदन दाडिंब पुष्प गमतसे ॥ भुरभुर उडती कमलमुखावरि कुंतल अलिवलयसे ॥ अतिशय शोभा दिसे वारितां करपल्लव शुभ्रसे ॥ चाल ॥ नृपधवलयशःश्री जणूं चमकते ॥ कीं मूर्त राजलक्ष्मी विलसते ॥ चाल ॥ शचि रति तारा धरि अवतारा काय सिंधुकन्यका ॥ गमे सिंधुकन्यका ॥ श्री० ॥ खरतर० ॥ २ ॥ चतुर सख्यांसह सलज्ज सुंदरि निरखित अपुला पती ॥ अखिल-जन्म-सोबती ॥ सकल जन कौतुकेंच पाहती ॥ कोण योग्य वर वरिल अशी स्त्री सभाग्य सुंदर अती ॥ मर्कटद्वय देखती गदगदां पोट धरुनि हांसती ॥ चाल ॥ मुनिभयें अवरिती कुणी मुखें लपविती ॥ लाविती पदर ते किती अति फजिती ॥ चाल ॥ होय वरी पाहुनी मुनीही मनिं हंसति परस्परमुखा ॥ नेणुनि अपुल्या मुखा ॥ श्री०॥ ॥ खरतर० ॥ ३ ॥ मंडपिं उठला हास्यध्वनि परि दाटला नृपनंदिनी ॥ शरमुनि अपमानुनी पातली पित्याजवळ परतुनी ॥ नमुनि म्हणे हो नको विवाह मि होइन संन्यासिनी ॥ होइन वैरागिणी तपें तनु कष्टवीन काननीं ॥ चाल ॥ न च पितृधनाचा मिळे मुलिस भाग तो ॥ बहु अल्प समस्तां नरांप्रती लाभतो ॥ चाल ॥ पोषणभारास्तव जन देती विगुणवरा कन्यका ॥ मर्कटाहि मौक्तिका ॥ श्री० ॥खर०॥ ४ वानर मर्कट मुनिवर्यां मुलि देशि कशीं दूषणें ॥ हीन वैभ-

वाविणें गमति परि भूषित विद्याधनें ॥ वस्त्रभूषणीं नट्टुनि मुरडुनी धनगर्वा वाहणें ॥ डौल जनां दाविणें ॥ समजशी धन्य काय हें जिणें ॥ चाल ॥ मुनिभार्या सुशिला सती पती सेवनीं ॥ राहुनी निरत त्या होति ब्रह्मवादिनी ॥ चाल ॥ वेदऋचाही रचिति कितिक त्या संस्कृत मुनिवायका ॥ अति संस्कृत बायका ॥ श्री० ॥ खर० ॥ ५ ॥ श्रीमतिवचनें ऐकुनि मुनिवर चित्तिं चमत्कारले ॥ अति लज्जित जाहले ॥ उठुनि भरसभेमधुनि चालले ॥ म्हणति परस्पर मत्सरेंचि हें दुःख जगीं पसरलें ॥ जग दुःखें आळलें खचित हीं कुविचाराचीं फळें ॥ चाल ॥ कुणी म्हणति दृष्टि तोडगे बाधती ॥ महा भुजंग मंत्रें कसे मोहिती ॥ चाल ॥ या योगानें गमत असे बहु चिंतनी शक्ती नका ॥ सिद्धांतचि हा निका ॥श्री०॥ खरतर० ॥ ६ ॥ जगन्मंगलासाठीं करिती तप पूर्वज तेव्हां कसा ॥ समाज तेव्हां कसा ॥ बहुत सुख भोगी श्रीमंतसा ॥ काळजठरिं तो गडप होउनी अवतरली अवदसा ॥ मत्सरसखि अवदसा ॥ प्रियासवें घालितसे धुडगुसा ॥ चाल ॥ नच कोणी कुणाचें बरें साहती ॥ वरीवरतुनी बरवे भले म्हणविती ॥ चाल ॥ अन्नपूर्णेशी परहितचिंतनिं बुद्धि विश्वपाळका ॥ देइं जगन्नायका ॥ श्रीमती० ॥ खरतर० ॥ ७ ॥

## गाणें ३२ वें, सीतासरमासंवाद.

चाल—मूर्तिमंत भीति.

बिभीषण कांतेपाशीं सीता गूज बोलते ॥ रामध्यासें रामरूपी होइन काय वाटतें ॥ ध्रु० ॥ धरुनि कोंडी कीटकासि कुंभकारी मक्षिका ॥ चंचुमारि धाक ध्यासें मक्षिकाच होय ते ॥ १ ॥ लागे ध्यास प्राणियांस अंतकाळिं ती स्थिति ॥ प्राप्त होय सिद्धांतचि सांगताति या श्रुती ॥ २ ॥ याच न्यायें रामध्यासें रामरूप जाहलें ॥ पतिपत्नी-मधुर-प्रेम-सौख्य मला कोठलें ॥ ३ ॥ अनूपम रामप्रेम काय सांगूं तूजला ॥ कराविण हार कंठिं पुष्पभार त्यागिला ॥ ४ ॥ रामशत्रु-अनुज-प्रिया सरमा देत उत्तरा ॥ देवि सिते व्यर्थ चिंता तापवीत अंतरा ॥ ५ ॥ रामध्यासें रामरूप जाहलीस तत्त्वतां ॥ तुझ्या ध्यासें रघूनाथ सहज होइल तो सिता ॥ ॥ ६ ॥ शंभु चापबाण घेइ उचालिसि तूं त्यापुढें ॥ वरी तुजसि लावुनि गूण करुनि राम तूकडे ॥ ७ ॥ गुणैक्यानें बद्धप्रीति दंपतीचि होय ते ॥ धन्य रामसीताप्रेम अन्नपूर्णा वर्णिते ॥ ८

## गाणें ३३ वें, धोपेश्वर गांव.

चाल—प्रभो विभो अगाध.

कधीं घडेल मला घडेल तुझी पदसेवा ॥ श्रीधूतपाप

कुलदेवा ॥ कधीं० ॥ धृ० ॥ तूं प्रगटलासि या भुवनीं ॥ तेव्हांची ऐकिलि कहाणी ॥ तो चमत्कार निशिदीनीं ॥ वाटतें प्रमोदें गावा ॥ कधीं० १ ॥ त्या पन्हाळें ग्रामीं एक ॥ असे विप्र वेदपाठक ॥ धेनूसि ठेवि रक्षक ॥ तो शूद्रहि भाविक बरवा ॥ कधीं० २ ॥ तो धेनु चारि कांतारां ॥ दिसे लिंग नदीच्या तीरीं ॥ भरे प्रेम भक्ति मनिं भारी ॥ ये धेनुसि पान्हा तेव्हां ॥ कधीं० ॥ ३ ॥ कां दुग्ध न देई गाई ॥ गोपालक कथी नच कांहीं ॥ द्विज गुप्त काननीं जाई ॥ वृत्तांत काय तो पाहावा ॥ कधीं० ॥ ४ ॥ आला दगड फोडुनि धरणी ॥ नमी रक्षक नेत्र मिटोनी ॥ पय गाळी धेनू नंदिनी ॥ अभिषेक करित महादेवा ॥ क० ॥५॥ द्विजमनीं क्रोध अति भरला ॥ शुद्रासि दंड मारिला ॥ देवासि लागतां फुटला ॥ जसा वायु-वेगें उडवावा ॥ कधीं० ॥६॥ परदुःख स्वयें सोशिती ॥ झणिं दिगंत पसरे कीर्ति ॥ हें ऐ-कुनि आंग्रे नृपती ॥ द्वय ग्रामें अर्पिति देवा ॥ कधीं० ७ ॥ धोपेश्वर नामहि ग्रामा ॥ नदितीरीं पन्हळें सीमा ॥ अन्न-पूर्णा दृढ धरी प्रेमा ॥ आठवे रम्य देखावा ॥ कधीं घडेल मला घडेल तुझी पदसेवा ॥ ८ ॥

# गाणें ३४ वें, शंकराचें.

चाल–तन मन धन.

वद वद वद सांब सांब ॥ भीशि कां भवा रे ॥ धृ० ॥ चंद्रकला पाहुनि शिरिं ॥ हृदयार्णविं प्रेमलहरी ॥ उठुनि दैन्य दुःख दुरी॥ सहज नेति सारें ॥ वद० ॥ १ ॥ झळ झळ कारि भाळिं ज्वाळ ॥ कर्णिं डुलति काळ व्याळ ॥ अंकिं उमा गणप बाळ ॥ सर्व काळ ध्या रे ॥ वद० ॥ २ ॥ सोहं वीणा घेउनि करीं ॥ बहु रुचिरा श्रुति सुंदरी ॥ गातां लीला विविधपरि ॥ रंगल्या किती रे ॥ वद० ॥ ३ ॥ शिव भजनीं मानि तोख ॥ विसरे अन्नपूर्णा शोक ॥ सुखद गमे शीवलोक ॥ भुवन समयिं त्या रे ॥ वद० ॥ ४ ॥

# गाणें ३५ वें, धोपेश्वर मंदीर.

चाल––मधुर किती पुष्प.

पाहिं मना धूतपापमंदीर ॥ धृ० ॥ विमल नदीचा जलौघ तेथें करितो ध्वनि गंभीर ॥ पा० ॥ १ ॥ स्वर्गतरूच्या सुमनसुवासा ॥ पसरवि मंद समीर ॥ २ ॥ शांतिदेवता बांधुनि सदना ॥ वसली या स्थळिं स्थीर ॥ पा० ॥ ३ ॥ श्रीशिवदर्शनिं अतिप्रेमानें ॥ नेत्रीं वाहे नीर ॥ पा० ॥ ४ ॥ म्हणे अन्नपूर्णा त्यजुनि राहावें ॥ संसृतीची किरकीर ॥ ५ ॥

# गाणें ३६ वें कीचकवध.

चाल—-उद्धवा शांतवन कर जा.

चंदनतरु काननिं जळतां दिग्मंडल व्यापि सुवासें ॥धृ०॥ गुप्तवेषें विराट नगरीं द्रौपदिसह पांडव होते ॥ तें जीमुत नामें आला तो पराभवित मल्लांतें ॥ म्हणे धर्म कंक तो राजा तव बल्लव जिंकिल यातें ॥ चाल ॥ नृप-आज्ञेनें त्या समईं ॥ आपटी भीम लवलाहीं ॥ मग हेमवलय नृप देई ॥ करिं बक्षिस घालुन हर्षें ॥ चं० ॥ १ ॥ माडीवरि राणि सुदेष्णा सैरंध्री दासिस बोले ॥ न च आल्यापासुनि ऐसें तव वदन प्रफुल्लित झालें ॥ बल्लवासि देतें तुजला वद मानसिं प्रेम उदेलें ॥ चाल ॥ समजुनी मौन सम्मतीशीं ॥ बोलाऊं पाठवी दासी ॥ म्हणे बक्षिस देइन त्यासी ॥ निज चित्तीं द्रौपदि हासे ॥ चंद० ॥ २ ॥ राज्ञिबंधु कीचक भेटे सोपान पंथि दासीला ॥ म्हणे जाशि कुठे ग बटकी ने भगिनिकडे झणिं मजला ॥ मम तोल कां न सावरशी तुज मिळतें नच खायाला ॥चाल॥ मारितां किंकळे दासी ॥ आलें स्वामिनि वांचवी मजशी ॥ आश्चर्य गमे द्रौपदिशी ॥ हिशि बल्लव ताडिल कैसें ॥ ३ ॥ सैरंध्री प्रेमें करुनी पातला किं बल्लव पाहे ॥ तंव घूर्णितलोचन ऐसा मद्यधुंद परनर आहे ॥ तनुपल्लविं अवगुंठानियां ती ग्रीवा लववुनि राहे ॥ ॥ चाल ॥ व्यसनाधिन अधम नरासी ॥ भागिनि-प्रेम न च

मराठी ग्रंथ संग्रहालय

बहु त्यासी ॥ न्याहाळितां सकळहि दासी ॥ ही चंद्रकला त्या दीसे ॥ चं० ॥ ४ ॥ हा सेनानायक भगिनी तव बंधु कीचक झाला॥तैंपासुनि भरती लागे नृपविराटभाग्योदधिला॥ तो मंथन करितां दिसलें हें अभिनव रत्नाचि मजला ॥ चाल ॥ हें अर्पण करिं मज ताई ॥ मजऐसा भोक्ता नाहीं ॥ कर धरितां झटका देई ॥ ती वाघिण खवळलि भासे ॥ चं० ॥ ५ ॥ गे उघडा स्वभाव त्याचा मजसम मुळिं कपटाचि नाहीं ॥ न च पुनरपि करितो ऐसें सैरंध्री कष्टि न होई ॥ सर मागें वेड्या म्हणुनी एकांतीं बंधुस नेई ॥ चाल ॥ भुल-वुनि तुजसम चतुरानें ॥ पांखरें हिं अंकित करणें ॥ हें कार्य नव्हे तांताडिनें ॥ तुज करीन मी वश होईसें ॥ चं० ॥ ६ ॥ एक दिवशीं तिसरे प्रहरीं सैरंध्री चामर वारी ॥ कीचकासि उत्तम मदिरा आणिं मागुनि ये मज लहरी ॥ तवसांनिध विटंबुनीयां धरुं आला त्या मंदीरीं ॥ चाल ॥ मज बळें धा-डिशी कां गे ॥ तूं आणिक दासिशी सांगें॥ म्हणे राज्ञी सत्वर जागे ॥ मी पाहातें करितो कैसें ॥ चं० ॥ ७ ॥ श्रीहरिपद-पंकज स्मरुनी प्रार्थना करी दिनमणिची ॥ रक्षाया राक्षस धाडी रवि निष्ठा पाहुनि सतिची ॥ बहु दूर उभी राहु-नियां कीचकासि मदिरा याची ॥ चाल ॥ म्हणे पाठवी न अणिकांसी ॥ तुज करी सुदेष्णा दासी ॥ तव सेवे लाविन तिजशीं ॥ अजि कोण विराटा पूसे ॥ चं० ॥ ८ ॥ बांधिली हवेली तेव्हां मज ज्योतिषि सांगत होते ॥ कीं दुष्ट ग्रह बहु

पडले तरि करा वास्तुशांतीतें ॥ हा कीचक वीर भजेना मृत्तिका दगड देवातें ॥ चाल ॥ तुजऐसी सुरम्य देवी ॥ या महालीं संस्थापावी ॥ तत्सेवनि तनु झिजवावी ॥ ये प्रिय-सखि मंचकिं बैसें ॥ चं० ॥ ९ ॥ कधिं धर्मराजहि मजला प्रियसखी असें नच वदले ॥ मर्यादा त्यजुनि न वदती ते पंचहि पांडव सगळे ॥ द्वारकाधीश भगवंतें प्रियभगिनी ऐसें गणिलें ॥ चाल ॥ संबोधुनि देवी मजला ॥ पति घडि घडि घेती सल्ला ॥ कामातुर हलकट मेला ॥ म्हणे कीचक मंचकिं बैसें ॥ चं० ॥ १० ॥ ती पळे द्रुपदनंदीनी तो लगट करीतां भारी ॥ ये कीचक मागुनि तीच्या भरसभेंत लत्ता मारी ॥ मारी राक्षस गुप्तपणें त्या क्षणिं पडला येउनि घेरी ॥ चाल॥ ही दीन न्यायप्रिय अबला ॥ गांजितांचि उलथुनि पडला॥ प्रभु प्रायश्चित्त खुलाला ॥ जन म्हणाति बरें दे ऐसें ॥ चं० ॥ मत्स्येश्वर न्यायासनि या अन्याय समीपचि होई ॥ त्या भूप म्हणावें कोणी जो प्रजेशि न्याय न देई ॥ तैं विराट कांहिं न बोले म्हणे कंक घरा तूं जाई ॥ चाल ॥ न च स्त्रीनें स-भेसि यावें ॥ त्वां राणिसि वृत्त कथावें ॥ सर्वेश्वर पद चिं-तावें ॥ जो वागवि कर्मासरिसें ॥ चं० ॥ १२ ॥ आरक्त नेत्र भीमाचे अति क्रोधें अधरा चावी ॥ तूं गुप्तपणें या मारीं प्रगट न हो धर्म खुणावी ॥ म्हणे वेड्या काय पहासी इंधनें तुला जरि व्हावीं ॥ चाल ॥ तरि बाह्य प्रदेशीं जावें॥ निष्फलित वृक्ष खंडावे ॥ निजकार्या झणिं लागावें ॥ जा

अवधि अल्प उरलासे ॥ चं० ॥ १३ ॥ पाकगृहीं पांडव-कांता मध्यरात्रिं भीमाजवळी ॥ कीचकें म्हणे दिलि लत्ता मम शीर्षिं गदा तरि घालीं ॥ म्हणे खेद नको करुं देवी वदुं किति मम हृदयीं सलली ॥ चाल ॥ तूं अनुमति दाउनि त्यासी ॥ निशि आण चित्रशाळेसी ॥ मग सूर्यपुत्रसदनासी ॥ वघ पाठवितों झणिं कैसें ॥ चं० ॥ १४ ॥ परललनादीपक-जोती नरमूढपतग जाळी ती ॥ द्रौपदिच्या निमित्त अवघे शतकीचक प्राणां मुकती ॥ ते पांडव गुप्तचि असतां चंदन-सम पसरे कीर्ति ॥ चाल ॥ हें दुर्योधनाला कळतां ॥ झाला विराट-गाई वाळेता ॥ अन्नपूर्णा संकटिं सरतां ॥ हरि रक्षी द्रौपदिऐसें ॥ चं० ॥ १५ ॥

# गाणें ३७ वें, गजेंद्रमोक्ष.

चाल—यमपाश गळ्याशीं ज्यास.

जो असासि जगाचा नाथ नको बघुं अंत धांव त्वरीत सोडवीं मजला ॥ ग्राशितो नक्र हा शरण पातलों तुजला ॥ धृ० ॥ वनराज गजेंद्र मी थोर त्रिकुट गिरिवर वसे तें फार कुसुमतरु सुफला ॥ निशिदिनीं वर्षती मंदमंद घनमाला ॥ जल झरे विमल वाहाति ॥ मयुर नाचती ॥ सवेग जगती ॥ क्रीडती पुष्करणी ॥ परि कठिण समयिं या न येति कामा कोणी ॥ जो० ॥ १ ॥ वनविहार करिं निःसंग विषयसुखिं

दंग पोळलें अंग उष्ण समयासी ॥ गंडकीतिरीं पातलों स्नानपानासी ॥ सर्वें सुता पुत्र पौत्र इष्टगण मित्र भ्रातृ कलत्र असति परि माया ॥ जलविहार करितां नक्र गिळी मम पाया ॥ जों० ॥ २ ॥ मज उद्धारि वारणचक्र न सोडी नक्र कर्मगति वक्र व्यर्थ श्रम झाले ॥ जलिं टाकुनि मज ते निजवनिं सकलहि गेले ॥ हें जग जरि प्रेमें नटे ॥ क्षणें पालटे ॥ अशा मी विटें ॥ पुरे ही माया ॥ नको ही माया ॥ भो चिद्धनस्वरूपा सत्वर ने तव ठायां ॥ जों० ॥ ३ ॥ झुंजतां नेत्रगत प्राण जाहले जाण न येशी अजुन भक्त प्रिय म्हणतां ॥ तुज हांसुन मृत्यू नेइल तो निजपंथा ॥ तंव शंखचक्रधर असें ॥ पितांबर कांसें ॥ स्वरुप दिव्यसें ॥ देखिलें नयनीं ॥ जें शुद्ध सात्त्विकावांचुनि ये न च ध्यानीं ॥ जों० ॥ ४ ॥ भक्तिनें होय मन विमल फेंकिलें कमल हरी प्रेमळ घालि तें वदनीं ॥ सह नक्र गजेंद्रा बैसविला निजयानीं ॥ म्हणविशी द्वंद्वरहीत भक्त अभक्त तराया शक्त शरण जरि चरणा ॥ कां उपेक्षितोसि विवाद करि अन्नपूर्णा ॥ ५ ॥

## गाणें ३८ वें, यमपुरी.

चाल—अर्जुना इतर मज.

पुसतसे यमाची कांता ॥ पतिचरणीं ठेवुनि माथा ॥ प्रियकरा ॥ मृत जीव तुम्ही आणीतां ॥ कां दुःख तयां

अति देतां ॥ प्रियकरा ॥ चाल ॥ यम म्हणे ऐक सुंदरी ॥ जन्म बहु वरि ॥ प्राणि जें करी पापफल त्यांना ॥ मी भोगवीं शिक्षा करुन ॥ जाण तूं ॥ सुख दुःख न दे कुणि कोणा ॥ भोगवी कर्म जीवांना ॥ जाण तूं ॥ धृ० ॥ १ ॥ मम किंकर जिव्हा चिरिती ॥ जे अनृत भाषण करिती ॥ त्यांचिया ॥ जे अभक्ष्यभक्षण करिती ॥ मुखिं तप्त तैल ओतीती ॥ त्यांचिया ॥ चाल ॥ द्वेषेंच भल्या निंदीती ॥ वर्म बोलती ॥ काग टोंचीति सतत सखि त्यांना ॥ भो० ॥ ॥ २ ॥ किति नरक कुंभिं शिजवीती ॥ असिधारवनीं हिंडविती ॥ बघ सखी ॥ किति तप्त स्तंभिं बांधीती ॥ ज्या जैशी अर्चित गती ॥ त्यापरी ॥ चाल ॥ विश्वासघात जो करी ॥ वस्तु बहु चोरी ॥ त्यासि यमपुरी ॥ कधिंहि सुटेना ॥ भो० ॥ ३ ॥ नरकालय उघडुनि द्वार ॥ कांतेशि निरय अपार ॥ दाखवी ॥ एक कुंड बघुनि समोर वैवस्वत दचके फार ॥ अंतरीं ॥ चाल ॥ म्हणे सखे फीर माघारिं ॥ कष्टि अंतरिं ॥ होशि बहुपरी ॥ बघुनि यातना ॥ भो० ॥ ४ ॥ यमकांता मूर्च्छित पडली ॥ निजमाता नरकीं दिसली ॥ तेधवां ॥ कां नाथ क्षमा नच केली ॥ प्रिय आप्त श्वश्रु आपूली ॥ म्हणुनियां ॥ चाल ॥ हो समर्थ जरि कुणी प्रिये ॥ निजार्जित नये ॥ बहुत उपाय ॥ चुकवितां कोणा ॥ भो० ॥ ५ ॥ प्राण्यासि नसे सुविवेक ॥ करुं म्हणे गुप्त पातक ॥ ठकपणें ॥ मग हांसाति कैसे लोक ॥ भूपतिचा चुकवूं धाक ॥

जरि बहू ॥ चाल ॥ भू तेज वायु आकाश ॥ साक्ष कर्मास नेति प्राण्यास ॥ नरकगत पतना ॥ भो० ॥ ६ ॥ बहुजन्म-पूर्वि तव माता ॥ अति दरिद्रि गोधुम दळितां ॥ एकदां ॥ कण पांच लेकरूं रडतां ॥ दे मालकासि नच पुसतां ॥ त्यामुळें ॥ चाल ॥ असे चौर्य पाप हें थोर ॥ नरकिं ने घोर ॥ धरा सुविचार ॥ म्हणे अन्नपूर्णा ॥ भो० ॥ ७ ॥

## गाणें ३९ वें, पल्लीपतन.

चाल—सुंदरी काय क.

पल्ली अंगावर पडली ॥ अथवा सरटी ही चढली ॥ ज्योतिषीं फलश्रुति सांगितली ॥ प्राकृत भगिनींस्तव केली ॥ पल्ली पडतां अंगावरती करुनीयां स्नानें ॥ द्यावीं माष तिल दानें ॥ धृ० ॥ १ ॥ पडतां शिरीं राज्यप्राप्ति ॥ कपाळीं बंधू भेटती ॥ भ्रुकुटीं राज्य सन्मान ॥ जाइल वरच्या ओष्ठिं धन ॥ ओठिं खालच्या पडतां मिळती ऐश्वर्यादि धनें ॥ द्यावीं० ॥ २ ॥ व्याधी पडतां नासांतीं ॥ वाढे आयू सव्य श्रुती ॥ वामकर्णिं ते लाभदाई ॥ नेत्रीं बंधनप्रद होई ॥ बाहुल्यांवरी पडतां पल्ली नृपालसम होणें ॥ द्या० ॥ ३ ॥ वामबाहुशीं राजकोप ॥ कंठीं शत्रूभय अमुप ॥ स्तनिं पडतां दुर्भाग्याचि तें ॥ उदरीं शुभमंडण होतें ॥ पडे पाल जरि पृष्ठीवरती बुद्धिनाश होणें ॥ द्या० ॥ ४ ॥ ढोंपर पोटरियाहि

शुभ ॥ दोन्हीं हस्तिं वस्त्रलाभ ॥ स्कंधीं होय विजय प्राप्ती ॥ बहुधनप्रद नाभीवरती ॥ मांड्यांवरतीं पडतां मिळती अश्वादिक वाहानें ॥ घा० ॥ ५ ॥ सव्य मणिबंधिं धनें जाती ॥ वामीं मिळते सुख कीर्ति ॥ नखावरी धान्यलाभप्रद ती ॥ वदनीं मिष्टान्नप्राप्ती ॥ गुल्फि बंधन केशीं मरण तें यापरि फल जाणें ॥ घा० ॥ ६ ॥ चालवी पथ दक्षिण पादीं ॥ बंधू-हानि वामपादीं ॥ पदमध्यावरि स्त्रीनाश ॥ मरणें पादांतीं खास ॥ दीप लावणें शिव-मंदिरिं शिवनाम मंत्र जपणें ॥ होइल मंगल अन्नपूर्णे ॥ घा० ॥ ७ ॥

श्री ग्रंथ संग्रहा... नं. ... ता.

## गाणें ४० वें पितृभक्ति.

चाल—अर्जुना इतर मज०

म्हणे भीष्म विनति हे ताता ॥ मजसम सुत अपुला असतां ॥ कां असे ॥ मनिं उदास काननिं फिरतां ॥ एकांतिं बसुनि झुरतां ॥ वाटतें ॥ चाल ॥ म्हणे तनयास सद्गुणगिरी ॥ चालविशि जरि ॥ घेउन निज शिरीं ॥ राज्य-भाराला ॥ परि पाठबळ न च तुजला ॥ वाटतें ॥ सत्पुत्र म्हणावें त्याला ॥ जो तोषवि निज जनकाला ॥ बहुपरी ॥ ॥ धृ० ॥ १ ॥ गंगात्मज पितया वदला ॥ मम माय जाय स्वर्गाला ॥ त्यजुनियां ॥ तरि करा द्वितिय विवाहाला ॥ मी आणिन नृपवर बाला ॥ जिंकुनी ॥ चाल ॥ म्हणे सुता

नको मज अतां ॥ दाशदुहिता ॥ मनोरमणीला ॥ नावेवर पाहातां तिजला ॥ मनिं भरे ॥ सत्पुत्र०॥२॥ युवराज भीष्म लवलाहीं ॥ कैवर्तक सदना जाई ॥ तेधवां ॥ तव कन्या करिं मम आई ॥ नृपश्वशुरमान तूं घेईं ॥ धीवरा ॥ चाल ॥ ही कोळि जात बहु भोळि भुले या बोलि अशापरि तुजला ॥ रे व्यर्थचि भ्रम हा झाला ॥ नृपसुता ॥ स० ॥ ३ ॥ स्वातंत्र्यसुखीं मम बाला ॥ वनिं सेवुनि भाजीपाला ॥ वाढली ॥ हा उघडा प्रदेश सारा दे प्रमोद शीतल वारा ॥ किति तरी ॥ चाल ॥ नौकेंत गातसे गाणिं लाटितां पाणि नरपती सदनिं कोंडुनी तिजला ॥ वद लाभ कोणता मजला ॥ नृपसुता ॥ स० ॥ ४ ॥ जरि कोणी नृपवर असता ॥ तरि जिंकुनि हरितों दुहिता ॥ या क्षणीं ॥ परि जुलुम प्रजेच्या वरता ॥ न च करी म्हणुनि तुज सुता ॥ प्रार्थितों ॥ नृपगृहीं सौख्यसाधना किती वर्णना करूं कल्पना नसे मुळिं तुजला ॥ बोलशी म्हणुनि या बोला ॥ धीवरा ॥ स० ॥ ५ ॥ तूं राज्याचा अधिकारी मम पौत्रां कोण विचारी ॥ नृपसुता ॥ जरि सकल सुखें संसारीं ॥ कलहानल जाळिल सारीं ॥ सहज तीं ॥ चाल ॥ म्हणे तुजसि होति जरि पौत्र धरिन मी छत्र राज्य सर्वत्र अर्पुनी त्याला ॥ सांगतों पितृपदकमलां ॥ स्मरुनियां ॥ स० ॥ ६ ॥ जरि पुत्र तुला ते होती ॥ राज्यास्तव रण माजविती ॥ मग पुढें ॥ सिंहासन ज्येष्ठा हातीं ॥ अधिकारें जिंकुनि घेती ॥ सहज ते ॥ चाल ॥ म्हणे भीष्म लग्न न च करीं

सकल सुंदरी जननिच्या परी यापुढें मजला ॥ रवि उगवे वरुण दिशेला ॥ तो जरी ॥स०॥७॥ बोलले तसे आचरले ॥ दिग्मंडल सुयशें भरलें ॥ त्यांचिया ॥ देवव्रत नामहि पहिलें ॥ पाळितां प्रतिज्ञा पडलें ॥ भीष्म हें ॥ चाल ॥ जाहला निजेच्छामरणी पितृवरदानीं तयाचे गुणीं हर्ष बहु झाला ॥ वर्णाया अन्नपूर्णेला चरित हें ॥ स० ॥ ८ ॥

## गाणें ४१ वें, बारा मास.

चाल—-आज सुदिन उगवला.

हरिचरण दाखवा खंति वाटते जिवा ॥ धृ० ॥ चैत्र मासिं पाडव्यास रामजन्म उत्सवास ॥ गौरि हळदिकुंकवास ॥ ध्वजा ऊभवा ॥ खं० ॥ १ ॥ मधुर मंद वाहे पवन ॥ वैशाखीं कुंभदान ॥ सुखवि कोकिलांचें गान रसिक बांधवां ॥ खं० ॥ २ ॥ धरुनि सौभाग्याचि आस ॥ नारि ज्येष्ठ पौर्णिमेस ॥ वटमूलीं सावित्रिस ॥ पुजिति जेधवां ॥ खं० ॥ ॥ ३ ॥ आषाढीं पंढरीस जाती ॥ नेम व्रतें आचरीति ॥ तुलसिमूलिं पूजिताति ॥ रुक्मिणीधवा ॥ खं० ॥ ४ ॥ श्रावणांत मंगळवारीं ॥ स्त्रिया पूजिताति गौरी ॥ सण सकलहि सप्तवारिं करिति उत्सवा ॥ खं० ॥ ५ ॥ भाद्रपदीं मंगलमूर्ति॥घरोघरीं पूजिताति॥ मोदकानें मोद अती ॥ प्राप्त हो नवा ॥ खं० ॥ ६ ॥ दुर्गापूजा आश्विनांत ॥ सण दसरा

थोर येत ॥ विजयोत्सवि लंघितात ॥ ग्रामिंच्या शिवा ॥ खं० ॥ ७ ॥ अगस्तीचा उदय होत ॥ दीपोत्सव कार्तिकांत कारिंशि जलें कमलयुक्त ॥ कुमुदबांधवा ॥ खं० ॥ ८ ॥ पुढें मास मार्गशीर्ष ॥ चंपाषष्ठिच्या सणास ॥ भजति खंडो मल्हारीस ॥ भक्त तेधवां ॥ खं० ॥ ९ ॥ पौषांत शीतवात ॥ संक्रांती सण येत ॥ तिळ देउनि वाढवीत ॥ स्नेह तोनवा ॥ ॥ खं० ॥ १० ॥ शिवरात्रि माघमासिं ॥ यात्रा जाय गोकर्णासि ॥ आम्रबिल्वमांजिरींसी ॥ अर्पिती शिवा ॥खं०॥११॥ नाहिं शीत उष्ण भारी ॥ फाल्गुनांत नरनारी ॥ भरुनि रंग पीचकारि ॥ क्रिडति तेधवां ॥ खं० ॥ १२ ॥ चक्र नेमें आजवरी ॥ येति जाती वर्षे सारीं ॥ प्रार्थि अन्नपूर्णा हरी ॥ येशि केधवां ॥ खंति वाटते जिवा ॥ १३ ॥

## गाणें ४२ वें, गजानन.

चाल--मधुर किती कुसुम.

गमे तो येइल शक्ति कुमार ॥ धृ० ॥ दुर्दैवाचा पवन दांडगा ॥ किंचित वाहे गार ॥ गमे० ॥ १ ॥ शुंडादंडें मम पड्वैरी ॥ आकळुनी करिं ठार ॥ गमे० ॥ २ ॥ विघ्नसमुह हा अतुर जाहला ॥ पळुनि जावया फार ॥ गमे० ॥ ३ ॥ आणिल गुरुतर गांठवडें तें ॥ विद्याधनभांडार ॥ ग० ॥ ४ ॥ आस धरुनियां प्राण रक्षिले ॥ दाविशि पदकल्हार ॥ ५ ॥ म्हणे अन्नपूर्णा या वृकसदनीं ॥ वाटे तव आधार ॥ ६ ॥

# गाणें ४३ वें, गजानन.

चाल—अतां रामपायीं मना लाग.

अतां धांव रे धांव तूं एकदंता ॥ नच मला या जगीं अन्य त्राता ॥ अतां० धृ० ॥ १ ॥ धांव गणनायका ॥ गौरिच्या बालका ॥ भक्तजनरक्षका तारिं आतां ॥ अ० ॥२ येइं मोरेश्वरा ॥ सकलविद्याधरा ॥ चरणिं दे आसरा ॥ दीननाथा ॥ अ० ॥ ३ ॥ संसृती-मोचना ॥ विघ्नविध्वंसना ॥ शांति दे मन्मना सिद्धिकांता ॥ अ० ॥ ४ ॥ वाग्देवी-प्रिय-पती ॥ येइं श्रीगणपती ॥ दाविं मूढाप्रती मोक्षपंथा ॥५॥ अंबिकानंदना ॥ भक्तभवभंजना ॥ अन्नपूर्णा श्रमे वाट पाहातां ॥ अतां ० ॥ ६ ॥

श्री ग्रंथ संग्रहा... नं.

# गाणें ४४ वें, गजानन.

चाल—मन विमल करुनी.

विधिकुमारीप्रियपति पाहिले ॥ पाहिलें तव सुंदर स्वरूप तें ॥ मुनिसनकादिकीं ध्याइलें ॥ विधि० ॥ १ ॥ गुण गाती श्रुतिस्मृति ॥ नृत्य करी सरस्वती ॥ सेवा करित सुरपती राहिले ॥ वि० ॥ २ ॥ स्मरणें पळती आधिव्याधि ॥ शीघ्र होय कार्यसिद्धि ॥ विघ्नयूथ बिदोबिदी चालले ॥ वि० ॥३ वरूं जातां कवणे नारी ॥ धांव म्हणति सिंदुरारि ॥ भक्तां-

साठीं ब्रह्मचारि राहिले ॥ वि० ॥ ४ ॥ चरण धरी अन्नपूर्णा ॥ चुकवाया जन्ममरणा ॥ करुणा करीं तनु मन वाहिलें ॥ ५ ॥

## गाणें ४५ वें, गजानन.

चाल—जा जा जा झणीं.

गजवदना मनमोहना तुला ॥ शरण दीन वनिता ॥धृ० शांभवि शिवपुत्रा ॥ मृदु कोमल गात्रा ॥ संसृतिची मम यात्रा ॥ सांग करविं आतां ॥ ग० ॥ १ ॥ उपासना ज्ञान ॥ न कळे साधन ॥ नच घडलें मुळिं कर्म ॥ यथासांग करितां ॥ ग० ॥ २ ॥ दया असे चित्तीं ॥ परि कैंची शक्ति ॥ वाटतसे बहु खंती ॥ उपकृति नच घडतां ॥ ग० ॥ ३ ॥ यास्तव गणनाथा ॥ गाइन तव गीता ॥ अन्नपूर्णा धरि चित्ता ॥ बुद्धि देइं तिजला ॥ ग० ॥ ४ ॥

## गाणें ४६ वें, रामसीताविनोद.

चाल—ऊठ बैस ऊठ बैस.

राम सीता एक दिवशिं वेष बदलुनी ॥ रंगमहालिं आरशांत बघति हांसुनी ॥ लीलाविनोदांत बहुत रात्र संपली ॥ मंदवातें नेत्रपातिं शीघ्र लागलीं ॥ वसिष्ठांनिं राम ध्यानिं

पहांटे पाहिला ॥ रघूवीर सत्व धीर प्रेमें गाइला ॥ मनुज
तेरे हर्षभरें ऐकतां लिला ॥ धृपद ॥ १ ॥ दिव्य
अंगनाच रघूराय तो असे ॥ जनकसुता ध्यानिं पा-
हातां तिलक ना दिसे ॥ अवतारकृत्य केलें अपुरें आदि-
पूरुषें ॥ घावरोनि राजगेहिं येउनी पुसे ॥ म्हणे राव स्वाम
काय स्वप्न पाहिला ॥ र० ॥ २ ॥ मातापिता सकल येति
शयनमंदिरीं ॥ पाहुं राम उघडि द्वार तुजसि सत्वरीं ॥
रामसीता गडबडुनी ॥ होति घावरीं ॥ पालटाया वेष वस्त्रें
पाहाति दूसरीं ॥ विलंब होत त्यांनिं द्वारभंग करविला ॥
र० ॥ ३ ॥ राम म्हणुनि पाहुं जातां लाजली सिता ॥ गडब-
डीनें वेष तोहि ये न त्यागितां ॥ मंदिलानें मुक्त सकल केश
विखुरती ॥ काढुं पाहातां मकरकुंडलांत गुंतती ॥ गुरूप्रती
पाहुनि अती राम शरमला ॥ र० ॥ ४ ॥ बीजवरा कमर-
पट्टा कर्णभूषणें ॥ कंठमाला काढुं नेणें राम कंकणें ॥ कंचुकी
न शीघ्र निघे तंग जाहली ॥ काढुं पाहतां गोंडयांचि ग्रंथि
बैसली ॥ ॥ म्हणुनि वदनिं शेला घेउनि राम राहिला ॥
र० ॥ ५ ॥ शेला नव्हे जानकिचा शालु देखती ॥ कारिति
खंति उदरिं ठाव देइना क्षिती ॥ वेश आचार धर्म कर्मं
ज्यांचि त्यांप्रती ॥ लीलेनेंहि अन्य करितां होय फजिती ॥
अनुभवांतिं ऐशि ग्रंथि बांधुनि राहिला ॥ र० ॥ ६ ॥ युव-
राजपदा त्यजुनि राज्यि बैसती ॥ वर्णधर्मनेमें प्रजा रक्षि
रघुपती ॥ स्वाहाकार स्वाध्यायांत निरत राहती ॥ विप्र

तेणें कालिं मेघ वर्षुनी क्षिती ॥ होय विपुल सजलयुता सस्य-श्यामला ॥ र० ॥ ७ ॥ फळें पुष्पें वृक्ष वाह्लि सतत लागती ॥ विविध शाखा तीन्हि वेळ धेनु दूभती ॥ क्षात्र वर्ण धर्म-कामिं देह अर्पिती ॥ नाना उद्यमांत मग्न वैश्य राहती ॥ शूद्रसंघ श्रेष्ठसेवलागिं वाहिला ॥ र० ॥ ८ ॥ रोग मृत्यु दैन्य दुःख सर्व निरखुनी ॥ ज्ञानपूर्ण होय सुखी आर्य-मेदिनी ॥ चालतील पंगु पृथ्विच्या प्रदक्षिणीं ॥ तुझ्या कृपे वेद म्हणति मूकही तिन्ही ॥ प्रेमभावें अन्नपूर्णा वंदिते तुला ॥ रघूवीर सत्वधीर प्रेमें गाइला ॥ ९ ॥

REFBK-0002567

REFBK-0002567

समाप्त.

तेणें कालिं मेघ वर्षुनी क्षिती ॥ होय विपुल सजलयुता सस्य-श्यामला ॥ र० ॥ ७ ॥ फळें पुष्पें वृक्ष वाह्लि सतत लागती ॥ विविध शाखा तीन्हि वेळ धेनु दूभती ॥ क्षात्र वर्ण धर्म-कार्मि देह अर्पिती ॥ नाना उद्यमांत मग्न वैश्य राहती ॥ शूद्रसंघ श्रेष्ठसेवलागिं वाहिला ॥ र० ॥ ८ ॥ रोग मृत्यु दैन्य दुःख सर्व निरखुनी ॥ ज्ञानपूर्ण होय सुखी आर्य-मेदिनी ॥ चालतील पंगु पृथ्विच्या प्रदक्षिणीं ॥ तुझ्या कृपें वेद म्हणति मूकही तिन्ही ॥ प्रेमभावें अन्नपूर्णा वंदिते तुला ॥ रघूवीर सत्वधीर प्रेमें गाइला ॥ ९ ॥

REFBK-0002567
REFBK-0002567

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.

# …गौरी-कथा.

साकीवृत्त.

…ा विद्याभ्यासा काशिक्षेत्रीं जातां ॥ तडाग-
उतरला शीतल छाया पाहातां ॥ १ ॥ येति
…तथें ग्रामिंच्या लघु लघु सुंदर बाला ॥ जलीं उत-
…ालिनि समुहचि वाटे द्विगुणित झाला ॥ कमल
परस्परें त्या विनोदेंच मारीती ॥ शिंपिति जलही
कोणी वेणी भिजली म्हणती ॥ हसति क्रीडती
…विती कोणी पाणी भरीती ॥ दुरुनि राजसुत मातुल
…कौतुक लीला पहाती ॥ एक कन्यका ओढी कुमु-
…जी कमल घे खुडुनी ॥ सक्रोधें ती चिडुनि
…ी अमंगल वदनीं ॥ नव्हे मला नच्च तुला दुः-
…नें … नसे भिति मम कांते
…ति तीच्या सप्त पिढ्यांतहि
…यापरि बोलुनी निघे जावया सु-
… बोले तुझ्या
…भाविक या
आराधीली ॥
॥ दीर्घ-
…त
…या

कन्येचें लग्न तुझ्याशीं व्हावें ॥ जी होय त्रिपुल सजलयुता सस्य-
मंगलव्रत प्रभावें ॥ तें लज्जायुत वृक्ष वाढि सतत लागती ॥
वदावें ताता ॥ नव्हे धर्म हा विप्राम्ध्ये ॥ क्षात्र वर्ण धर्म-
कांता ॥ मातुल बोले तिजशिं बालिके आम्हीं वैश्य राहती ॥
मार्ग दाखवीं पितृगेहाचा येऊं तुझिया संगें ॥॥ रोग मृत्यु
नुनि तिच्या पित्यानें इच्छित हेतू पुसतां ॥ मातुश्री आर्य-
प्रीति उपजली यात्रि कुमारा दुहिता ॥ वाङ्निश्चय हा॥ तुझ्या
आतां लग्न कसें मोडावें ॥ निशिं लग्नोत्सव पाहुनिअन्नपूर्णा
उदइक मार्गीं जावें ॥ विषाद पावुनि राजपुत्र तो ॥
करी देवीला ॥ बांधिन मंदिर सुशील पत्नी लाभे ज
पुत्याला ॥ वर योजिला अकस्मात त्या शीतज्वर ये भ
वऱ्हाड उतरे तिथे जाय ह्मणें मातुल जोतिषि ब
वाराणशिचे जोतिषि आम्ही पाहं ..धुवर घ
काय करूं ज्वर भरे वर-मा...
लपाचि आहे उदयिक होइल बरवें ।
लग्न लावुनी द्यावें ॥ हा मजसंगें वु
कोणा ॥ लग्न ... उ...
हर्षुनियां त्या ...
बांधितां म्हण...
वहु...यावर...
नि...
सु...

तुर म्हणविशी बावरि होशी नांव घेशि कवणाचें ॥
ी नांव पत्निचें ठेविशि कां तूं पतिचें ॥ म्हणे
से बदलिली पाणिग्रहणा वेळे ॥ प्राणपती ते कोठें
ण हा नकळे ॥ परपुरुषाशीं रंग न खेळें पति-
ं ॥ देइन प्राणहि जरी कळेना सत्य पतीची
धांतीं कळलें सकलां मातुलभाचे दोघे ॥
नि गेले काशिपुराला वेगें ॥ म्हणे सु-
ं जाइन मी त्या सरशी ॥ जाय घनासह
दि चंद्रासरशी ॥ जाय घेउनी तिचा पिता
शी ॥ डेरे देउनि असति उतरले स्वाधिन
जलेनें बहु दिन जातां आला श्रावण
प्रातःकाळीं प्रार्थि सून श्वशुरास ॥
असे मंगळागौरी ॥ कृपा करोनी
ी सारी ॥ चीरकंचुकी तांबुल कं-
। विविध सुवासिक बहुताचे पुष्पें
धान्यें बहु पक्वान्नें मोदक वायन
करोनी जाग्रण रात्रिं करावें ॥
निशि ध्यानस्थहि बसली ॥
गौरीची ठसली ॥ नी-

शिरला ॥ बद्ध करावें माथणिमुख मुलि ऐसें कोण
काढुनि कंचुकि माथणि बांधी पुनरपि ध्यानीं रं
धांवा राजपुत्र तो झोंपेमध्यें वरळे ॥ येइ धांवुनि
त्याचा जमती सेवक सगळे ॥ दंश कराया सर्प
अंगना त्याला ॥ होय मारिती आणुनि त ॥
घातीला ॥ पहा पहा हो म्हणतां दिसला न
मंदिर उजळे प्रभा फांकली हर्ष दाटला ॥
गर्जुनि म्हणती अपमृत्यू हा टळला ॥ पाहुनि
करावें नउपकारा सकलां ॥ काशिक्षेत्रीं जपुत्र तो
गौरी स्थापीली ॥ व्रतसंपूर्णी राजसुताला लाभे ज
आली ॥ मातुल बोले निज नगराप्रति येथे भ
कष्ट पावलीं जनकजननि तव वाटलें जीतपि ब
येतां गेहीं चरणिं सुनेच्या येउनि धुवर घ
बाळ वांचला व्रतें कोणत्या सांगे
पूजिती स्त्रिया मंगलागौरी ॥ अ
हरति संकटें सारीं ॥ सौभाग्याची
चरणा ॥ प्रेमें प्राकृत करी कथा

ळयुता सस्य-
त लागती ॥
वर्ण धर्म-
राहती ॥
॥ रोग मृत्यु
सुखी आर्य-
॥ तुझ्या
अन्नपूर्णा
॥